संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर - 440018
महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
जोडी घेतल्यास फक्त 4 रुपयात

नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

✲ वर्ष ५० ✲ अंक २५२ ✲ ✲ अमरावती ✲ शनिवार दिनांक ०८ मार्च २०२५ पुरवणीसह पाने ८ किंमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)




अग्रलेख

## खरीखरी..

## राष्ट्रीय लोकशाहीतील पोलीस

पोलीस म्हणजे गुन्हेगारांना धौस देऊन त्यांच्याकडून गुन्हेगारी कृत्य वदवून घेणारी यंत्रणा आहे. आजकाल सर्व सरकारी यंत्रणा नियमाप्रमाणे वागतीलच, याची शाश्वती नाही. त्यामुळेच पोलिसांचाही जो जुना दरारा होता. तो आता अजिबात वाटत नाही. इंग्रजांनी पोलिसांची यंत्रणा उभी केली होती. त्यांच्या काळात एखादा पोलीस गावात आला, तरी गावातील जनतेला त्याचा धाक वाटत होता. आता काही पोलिसांच्या वर्तनाने पोलीस खात्यावर शिंतोडे उडत आहेत. त्याची तमा न बाळगता आपली हौस भागवण्यासाठी अनेक वेळा जे प्रकार पोलिसांकडून होत आहेत. त्यामुळे पोलीस खाते बदनाम होत आहे. परवा पिंपरी चिंचवड येथील एका पोलीस ठाण्याच्या बाहेर मुख्य रस्त्यावर अशीच एक घटना घडली. सांगवी पोलीस ठाणे येथे एका श्रीमंत पोलीस महाशयाचा वाढदिवस अत्यंत थाटामाटात साजरा झाला. त्यासाठी त्या प्रतिभाशाली पोलिसांनी जे कार्यक्रम साजरे केले. ते वाचून तुमची करमणुकही होईल आणि तुम्हाला काळजीही वाटेल. करमणूक याकरता की, आजकाल करमणुकीची बरीच साधने असूनही पोलिसांनी आपले कर्तव्य विसरून चक्क पोलीस ठाण्याच्या बाहेरच्या रस्त्यावरच अगदी मधोमध कार्यक्रम साजरा केला?. बरोबर रात्री, नव्हे मध्यरात्री बाराच्या ठोक्याला गगनचुंबी आतषबाजी केली गेली. फटाके वाजवले गेले. एकूण सरंजाम असा काही होता की, जणू एखाद्या मोठ्या श्रीमंत बापाच्या मुलाचे लग्न सुरू आहे. भला मोठा केक, फटाके आणि त्या सर्वांचे शूटिंग करण्यासाठी ड्रोन कॅमेरा अशी एकदम सरंजामी व्यवस्था होती. त्याचवेळी फटाक्यांची फायर गन आणली गेली होती. या सगळ्याचा व्हिडिओ ड्रोन मार्फत बनवला गेला. तो दुसऱ्या दिवशी प्रसारित करण्यात आला. त्याहून जास्त गंभीर गोष्ट म्हणजे त्याच परिसराच्या हद्दीतले चार गुन्हेगार तो वाढदिवस साजरा करण्यासाठी उपस्थित होते. तर याचे परिणाम आता यापुढे काय होतील. याची जराही तमा न बाळगता त्यांनी जो काय धांगडधिंगा घातला त्याला तोड नाही. आपल्या पोलीस खात्याला शिस्त लावण्यासाठी राज्याचे गृहखाते आपले शिस्तप्रिय गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या ताब्यात ठेवले आहे. जंगजंग पछाडूनही पोलीस खाते इतर कोणाच्याही ताब्यात देण्यात आलेले नाही. याचे कारण गृह खात्याला बदनामीपासून वाचवणे आणि पोलीस खात्याला शिस्त लावणे हे त्यांचे उद्दिष्ट असावे. मात्र एकटे मुख्यमंत्री या सगळ्या गोष्टी कुठेकुठे आणि कशाकशा पद्धतीने बघणार. आता अनेक शहाणे पत्रकार मथळे देताना गृहमंत्र्यांच्या शहरात अमुकतमुक घडले असे छापतात. त्या गुन्हेगारीशी गृहमंत्र्यांचा संबंध काय, याचा साधा विचारही आमचे अनेक शहाणे पत्रकार अजिबात करीत नाहीत. कालच झालेल्या या घटनेशी गृहमंत्र्यांचा बादरायण संबंध जोडून विरोधी पक्ष किंवा पत्रकार याचा बाऊ करणार नाहीत, असे नाही. तरीही आपल्या पोलिसांना असले प्रकार करण्याची सद्बुद्धी कशी काय होते. हेच आम्हाला कळत नाही. आपले कर्तव्य काय, आपली प्रतिमा काय आहे. आपल्याला कोणकोणत्या गोष्टींची दक्षता घ्यायला पाहिजे. आपले वर्तन कोणीही दुर्वर्तन ठरवू नये आणि आपला दरारा कायम ठेवावा. यासाठी आपल्या मनातील महत्त्वाकांक्षी अभिलाषा प्रकट न करणे. वगैरे सारख्या अनेक बाबींवर गंभीरपणे यापुढे विचार करण्याची गरज आहे. पण या सर्व बाबींवर विचार करणे तर सोडा. अगदी राजरोसपणे आपले कोण काय बिघडवू शकतो, असा विचार करूनच असे प्रकार घडत असतात. तरीही गृह खात्याने या प्रकरणात संबंधित पोलिसांना अंमलदारांना आणि अधिका?यांना निलंबित केलेले आहे. हे निलंबन कदाचित लवकरच रद्द होईल. याची शंभर टक्के खात्री संबंधितांना असावीच असावी. जेव्हा हे निलंबन रद्द होईल. तेव्हा त्याची चर्चा कुठेही होणार नाही. हेही आपल्याला ठाऊक आहे. आपल्या लोकशाही देशात असे प्रकार राजरोस होतात. परंतु त्यावर तात्पुरती चर्चा आणि कारवाई होते आणि त्यानंतर हातापाया पडल्यावर 'तेरी भी चुप आणि मेरी भी चूप' अशा पद्धतीने पुन्हा तेच ते प्रकार करण्याचा परवाना मिळून जातो. हीच खरी लोकशाही आहे, असे आपण समजावे काय.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# लाखो नागरिक होणार वीज बिलमुक्त!

### मुख्यमंत्र्यांची मोठी घोषणा
### शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत मोठी घोषणा केली आहे. महाराष्ट्रातील वीज ग्राहकांसाठी योजना जाहीर करण्यात आली असून, यातून लाखो वीज ग्राहकांना वीज बिलमुक्ती मिळणार असल्याचे फडणवीस यांनी सांगितले आहे. प्रधानमंत्री सौरघर योजनेच्या धर्तीवर राज्यात नवीन योजना सुरू करण्यात येणार आहे. तसेच शेतकऱ्यांना ३६५ दिवस वीज उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले.

फडणवीस म्हणाले, नवीन वीज धोरणांतर्गत स्मार्ट मीटर बसवणाऱ्या ग्राहकांना व जे दिवसा वीज वापरतील त्यांना १० टक्के वीज दरात सवलत दिली जाणार आहे. हे ग्राहक आपल्या विजेच्या वापरावर अधिक चांगल्या पद्धतीने नियंत्रण ठेऊ शकतील आणि यामुळे राज्याच्या ऊर्जा बचतीला हातभार लागेल.

जी वीज आपल्याला ८ रुपयांना पडत होती ती आता केवळ ३ रुपयांना पडणार आहे, म्हणजे यूनिटमागे ५ रुपये आपण वाचवत आहोत. याचा जवळपास ७० टक्के ग्राहकांना थेट फायदा होणार असल्याचेही फडणवीस म्हणाले.



राज्यातील ८० टक्के ग्राहक हे ० ते १०० युनिट वीज वापरणारे आहेत. सरकारच्या नव्या योजनेनुसार, या ग्राहकांना सौरऊर्जा प्रकल्पांतर्गत वीज मोफत मिळणार आहे. सोलर पॅनल बसवण्यासाठी अनुदान देण्यात येणार आहे, ज्यामुळे दीड कोटी ग्राहकांना विजबिलाचा भार सहन करावा लागणार नाही, असे ते म्हणाले.

बळीराजा मोफत वीज योजना लागू करण्यात आली असून, याचा फायदा तब्बल ४५ लाख कृषी पंपधारकांना होणार आहे. या योजनेसाठी सरकारने १४ हजार कोटी रुपये तरतूद केली आहे. एकूण वीज खरेदी खर्चात १० हजार कोटी रुपयांची बचत होणार असल्याचेही फडणवीस यांनी सांगितले.

### छत्रपती संभाजी महाराज आणि कबुतर प्रकरणावर
## विधान परिषदेत गदारोळ



राणे-परब यांच्यात तीव्र खडाजंगी, विधान परिषद तीन वेळा तहकूब

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
विधान परिषदेत शुक्रवारी छत्रपती संभाजी महाराज आणि पिजन होल (कबुतर प्रकरण) यावरून मोठा गदारोळ पाहायला मिळाला. आमदार अनिल परब यांनी स्वतःची तुलना छत्रपती संभाजी महाराजांशी केली आणि राज्यपालांच्या अभिभाषणात पिजन होल असा उल्लेख केला. या विधानामुळे सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी तीव्र संताप व्यक्त केला आणि परब यांनी माफी मागावी, अशी मागणी केली.

यावरून मंत्री नितेश राणे आणि परब यांच्यात जोरदार खडाजंगी झाली. दोन्ही बाजूंच्या आमदारांनी घोषणाबाजी सुरू केली, त्यामुळे सभागृहाचे काम तीन वेळा तहकूब करावे लागले. सभापती राम शिंदे यांनी हस्तक्षेप करत सदस्यांना शांत राहण्याचे आवाहन केले, मात्र गोंधळ सुरूच राहिला.

अनिल परब म्हणाले, संभाजी महाराजांचा धर्म बदलण्यासाठी छळ करण्यात आला. तसाच माझा छळ पक्ष बदलण्यासाठी केला जात आहे. मला ईडी आणि सीबीआयच्या नोटिसा पाठवल्या गेल्या. परब यांच्या या विधानाने सत्ताधारी पक्षाचे आमदार चांगलेच आक्रमक झाले. मंत्री शंभूराज देसाई आणि भाजपचे आमदार प्रवीण दरेकर यांनी परब यांनी सभागृहात माफी मागावी, अशी मागणी लावून धरली.

महाविकास आघाडी सत्तेत असताना लोकांची घरे पाडली गेली. परंतु, एका कारकुनाचा कोणी छळ करू शकत नाही. यांच्याच सरकारने केंद्रीय मंत्र्याला अटक केली. आता जैसी करणी वैसी भरणी होत आहे. मातोश्रीची फरशी चाटण्याचे काम परब यांनी केले आहे, असा आरोप राणे यांनी केला. त्यावर, राणे कुटुंबाच्या नावावर चार-चार खून आहेत. हे खुनी लोक आम्हाला शिकवणार का? हे लोक खुनी आहेत. स्वतः मातोश्री चाटून-चाटून इथपर्यंत आलेत. आता हे आम्हाला सभ्यता शिकवणार का? असे परब म्हणाले.

परब यांच्या या वक्तव्याने सभागृहात मोठा गदारोळ निर्माण झाला. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही आक्रमक झाल्याने सभापतींनी तीन वेळा सभागृह तहकूब केले. विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी वादाबद्दल दिलगिरी व्यक्त केली. संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांनी संसदीय शब्द वगळण्याची सूचना करत, वाद मिटवण्याचे आवाहन केले.

## राहुल गांधी यांची धारावीला भेट



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
राहुल गांधी यांनी मुंबईतील धारावी येथे असलेल्या चमार स्टुडिओला भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी प्रसिद्ध डिझायनर सुधीर राजभर आणि त्यांच्या टीममधील कुशल कारीगरांशी संवाद साधला.

चमार स्टुडिओ हा पारंपरिक दलित आणि चर्मकार समाजाच्या कलेला आधुनिक व्यापाराच्या संधींसोबत जोडणारा उपक्रम आहे. येथे जुन्या टायर आणि इतर पुनर्वापर करता येणाऱ्या वस्तूंमधून हस्तकलेच्या विविध उत्पादने तयार केली जातात. या भेटीत राहुल गांधी यांनी समावेशक उत्पादन तंत्रज्ञानाच्या महत्त्वावर भर दिला.

### धारावी प्रकल्पाला स्थगिती देण्यास
## सुप्रिम कोर्टाचा नकार

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. ७ :**
सर्वोच्च न्यायालयाने शुक्रवारी धारावी पुनर्विकास प्रकल्पाच्या (डीआरपी) सुरू असलेल्या बांधकामाला स्थगिती देण्यास नकार दिला. तसेच, मुंबई उच्च न्यायालयाने अदानी समूहाच्या बाजूने दिलेला निर्णयही पलटण्यास नकार दर्शवला.

यूएई स्थित सेकलिंक टेक्नॉलॉजीज कॉर्पोरेशनने दाखल केलेल्या याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने म्हटले की, प्रस्तुत प्रकल्पाचे काम आधीच सुरू झाले आहे, ज्यामध्ये काही रेल्वे क्वार्टर पाडण्याचा समावेश आहे. सेकलिंकने मागील बोली नाकारल्यानंतर धारावी प्रकल्प अदानी प्रॉपर्टीज लिमिटेडला देण्याच्या महाराष्ट्र सरकारच्या निर्णयाला आव्हान दिले होते.

भारताचे सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि न्यायमूर्ती पीव्ही संजय कुमार यांच्या खंडपीठाने म्हटले, मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय योग्य होता, कारण रेल्वे मार्गाचा विकास करून त्याचा या प्रकल्पात समाविष्ट केला जाईल. न्यायालयाने महाराष्ट्र सरकार आणि अदानी प्रॉपर्टीजना नोटीस बजावून उत्तर मागितले आहे. पुढील सुनावणी 25 मे रोजी होईल. धारावी प्रकल्पासाठी सुरुवातीला 7200 कोटी रुपयांची बोली लावणा?या सेकलिंक टेक्नॉलॉजीजने सर्वोच्च न्यायालयाला सांगितले की, ते त्यांची बोली 20 टक्क्यांनी वाढवण्यास तयार आहेत. त्यावर खंडपीठाने सेकलिंकला त्यांच्या सुधारित बोलीची माहिती देणारे प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे निर्देश दिले.

## विधिमंडळ पायऱ्यांवर महाविकास आघाडीचे आंदोलन




■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
राज्यात महिलांवरील अत्याचाराच्या घटना वाढत असताना सरकार त्याकडे दुर्लक्ष करत असल्याचा आरोप करत महाविकास आघाडीच्या आमदारांनी आज विधिमंडळाच्या पायऱ्यांवर आंदोलन केले. महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या या आंदोलनात, महिलांच्या सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकारला जाब विचारण्यात आला.

पुण्यातील स्वारगेट बलात्कार प्रकरणात पोलिस प्रशासन आणि मंत्र्यांच्या वक्तव्यामुळे पीडितेची बदनामी झाल्याचा आरोप करत, मंत्री योगेश कदम यांचा राजीनामा देण्याची मागणी विरोधकांनी केली. तसेच, मंत्री जयकुमार गोरे यांच्यावरही एका महिलेने गंभीर आरोप केले असल्याने, त्यांचाही राजीनामा घेण्यात यावा, असा आग्रह धरला.

महिला सुरक्षेच्या मुद्द्यावर सरकारला लक्ष्य करत, विरोधकांनी जोरदार घोषणाबाजी केली.
महिला झाल्या बेपत्ता, सरकारला नाही पत्ता
महिला सुरक्षेचा नुसतं गाजर, सरकारला नाही पाझर
बेटी बचाव जुमला है, ये मंत्री दरिंदा है...
अशा घोषणा देण्यात आल्या.

महायुती सरकारने निवडणुकीपूर्वी महिलांना दरमहा २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र, सत्ता स्थापन झाल्यानंतर अनेक महिलांना अपात्र ठरवण्यात आल्याचा आरोप करीत सरकार २१०० रुपये कधी देणार? असा सवाल विरोधकांनी केला.

# ....पण बदनामी करू नका!

### एकनाथ शिंदेंचा ठाकरेंना टोला



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विधानपरिषदेत बोलताना शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर चांगलेच तोंडसूख घेतले. विरोधकांनी आम्हाला शाबासकी देऊ नये, तसेच बदनामही करू नये. फितरत हमारी सहन करने की न होती, तो हिंमत आपकी बोलने की ना होती, असा शेर ते यासंबंधी आपल्या अंदाजात म्हणाले. कोरटकर असो किंवा सोलापूरकर सरकार महापुरुषांचा अवमान करणाऱ्या कुणालाही सोडणार नाही, असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

एकनाथ शिंदे राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना म्हणाले की, राज्यपालांनी महाराष्ट्राचे सुस्पष्ट चित्र राज्यापुढे मांडले. आम्ही विक्रमी बहुमताने निवडून आलो. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात आमची दमदार वाटचाल सुरू आहे. पण विरोधकांची कॅसेट उद्योग बाहेर गेल्यावरच अडकली आहे. विरोध भय्याजी जोशी यांच्या विधानाचे राजकारण करत आहेत. त्यांनी आपल्या विधानावर स्पष्टीकरणही दिले आहे.

छत्रपती संभाजी महाराज यांचा अवमान करणाऱ्या अबू आझमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी मीच केली होती. आमचे सरकार छत्रपती शिवाजी महाराज, संभाजी महाराज आदी महापुरुषांचा अवमान करणा?यांना सोडणार नाही. अबू आझमी असो, प्रशांत कोरटकर असो किंवा राहुल सोलापूरकर यांनाही सोडणार नाही. शिंदे यांच्या या विधानाचे सभागृहातील सदस्यांनी बाके वाजवून स्वागत केले.

## ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्कारांची घोषणा

■ **महासागर प्रतिनिधी**
**मुंबई, दि. ७ :**
राज्य सरकारच्या वतीने दिल्या जाणाऱ्या ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले पुरस्काराची घोषणा मंत्री चंद्रकांत पाटील यांनी सभागृहात केली. यात त्यांनी पुरस्कार प्राप्त महिलांची नावे देखील वाचून दाखवली.
पुणे - जनाबाई सिताराम उगले, नाशिक - डॉ. प्राजक्ता गिरीश कुलकर्णी, कोकण - फुलन ज्योतिराव शिंदे, छत्रपती संभाजीनगर - मीनाक्षी दयानंद बिराजदार, अमरावती - वनिता रामचंद्र अंभोरे, नागपूर - शालिनी आनंद सक्सेना अशी या पुरस्कार विजेत्या महिलांची नावे आहेत. लवकरच त्यांना पुरस्कार प्रदान केले जातील.

## जॅग्वार लढाऊ विमान कोसळले




■ **वृत्तसंस्था, पंचकुला, दि. ७ :**
हरियाणातील पंचकुला येथे शुक्रवारी भारतीय हवाई दलाचे जॅग्वार लढाऊ विमान कोसळले. हे विमान अंबाला एअरबेसवरून प्रशिक्षण उड्डाणासाठी निघाले होते. वैमानिक विमानातून सुरक्षित बाहेर पडला.

पंचकुलाच्या मोरनी येथील बलदवाला गावाजवळ हा अपघात झाला. दुपारी ३.४५ वाजता तांत्रिक बिघाडामुळे हा अपघात झाल्याचे हवाई दलाने सांगितले. वैमानिकाने विमान निवासी क्षेत्रापासून दूर नेले आणि नंतर सुरक्षितपणे बाहेर पडले. अपघाताची चौकशी करण्यासाठी हवाई दलाच्या तज्ज्ञांचे पथक घटनास्थळी पोहोचले आहे. स्थानिक पोलिसही घटनास्थळी उपस्थित आहेत.

## हिंदी विश्वविद्यालयाच्या कुलगुरूपदी प्रो. कुमुद शर्मा

■ **महासागर प्रतिनिधी, वर्धा, दि. ७ :**
दिल्ली विद्यापीठाच्या हिंदी विभागाच्या अध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक, समीक्षक आणि मीडिया तज्ज्ञ आणि साहित्य अकादमीच्या उपाध्यक्ष प्रोफेसर कुमुद शर्मा यांनी आज शुक्रवारी महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालय, वर्धा येथे कुलगुरू म्हणून पदभार स्वीकारला.



गुरुवार, ०६ मार्च रोजी भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने जारी केलेल्या आदेशानुसार प्रो. कुमुद शर्मा यांची हिंदी विश्वविद्यालयाच्या कुलगुरूपदी नियुक्ती करण्यात आली. त्यांची नियुक्ती पदभार स्वीकारल्यापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी असेल. कुलगुंरूच्या कक्षात विश्वविद्यालयाचे कार्यवाहक कुलगुरू प्रो. हनुमानप्रसाद शुक्ला यांनी त्यांना पदभार सोपवला. या प्रसंगी कुलसचिव प्रो. आनन्द पाटील उपस्थित होते. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांनी विश्वविद्यालयाचे अधिष्ठाता, विभागाध्यक्ष आणि निदेशकांसोबत बैठक घेतली.

# राज्याचा आर्थिक पाहणी अहवाल सादर : उत्पन्नापेक्षा खर्च जास्त

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ७ :**
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारने शुक्रवारी विधिमंडळाच्या पटलावर आर्थिक पाहणी सर्वेक्षण अहवाल सादर केला. त्यात राज्याचा विकासदार व महत्त्वाच्या योजनांची महत्त्वपूर्ण आकडेवारी मांडण्यात आली आहे.

या आकडेवारीनुसार, राज्यापुढील आर्थिक संकट वाढले असून, खर्च हा महसुली उत्पन्नापेक्षा जास्त होत आहे. कर्ज व व्याजापोटी एक मोठी रक्कम खर्च होत असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. विशेषतः लाडकी बहीण योजनेंतर्गत जून 2024 ते डिसेंबर 2024 या कालावधीत राज्यातील 2 कोटी 38 लाख लाभार्थी महिलांना तब्बल 17 हजार 505 कोटी रुपयांचा निधी वितरीत करण्यात आल्याची

### आर्थिक संकटात वाढ; लाडक्या बहिणींवर १७,५०५ कोटींचा खर्च

माहितीही या अहवालाद्वारे देण्यात आली आहे.



उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार यांनी शुक्रवारी आर्थिक पाहणी अहवाल सादर केला.त्यानुसार, त्यात 2024-25 साठी वित्तीय तूट 2.4 टक्के तर महसुली तूट 0.4 टक्के इतकी अंदाजित करण्यात आली आहे. तर भांडवली उत्पन्नाचा वाटा 24.1 टक्के तर भांडवली खचार्चा हिस्सा 22.4 टक्के इतका आहे. महसुली जमा 4 लाख 99 हजार 463 कोटी रुपये अपेक्षित तर महसुली खर्च 5 लाख 19 हजार 514 कोटी अपेक्षित आहे.

राज्याच्या आर्थिक पाहणी अहवालानुसार, राज्याचे 2024-25 चे स्थूल उत्पन्न 45 लाख 31 हजार 518 कोटी इतके आहे. स्थूल राज्य उत्पन्नाच्या तुलनेत कर्ज आणि व्याजापोटी 17.3 टक्के रक्कम खर्च होत आहे. महाराष्ट्राचा आर्थिक विकास दर 7.3 टक्के राहील. कृषी क्षेत्राचा विकास 8.7 टक्के, उद्योग क्षेत्राचा विकास 4.9 टक्के तर सेवा क्षेत्राचा विकास 7.8 टक्के असणार असल्याचेही यात नमूद करण्यात आले आहे. प्रस्तुत अहवालानुसार, महाराष्ट्रात नोव्हेंबर 2024 पर्यंत 1884 शिवभोजन केंद्र कार्यरत आहेत. 2024-25 मध्ये नोव्हेंबर महिन्यापर्यंत 3.97 कोटी शिवभोजन थाळींचा लाभ लोकांनी घेतला आहे.

२०२४-२५ साठी नाममात्र जीएसडीपी (सध्याच्या किंमतीत) ४५.३१ लाख कोटी तर स्थिर किंमतीत ?६.१२ लाख कोटी असण्याचा अंदाज.

२०२३-२४ मध्ये महाराष्ट्राचा नाममात्र जीएसडीपी ४०.५५ लाख कोटी होता, तर २०२२-२३ मध्ये तो ३६.४१ लाख कोटी होता. महाराष्ट्राचा राष्ट्रीय जीडीपी मधील वाटा १३.५% असून, हा सर्वाधिक आहे. २०२४-२५ मध्ये प्रति व्यक्ति उत्पन्न ३,०९,३४० पर्यंत पोहोचणार, जो २०२३-२४ मध्ये २,७८,६८१ होता.

दरम्यान, सभागृहात सादर करण्यात आलेल्या पाहणी अहवालावरून विरोधकांनी सरकारला टीकेचे लक्ष्य केले.

# शिंदेंचे दोस्त अजय अशर यांची 'मित्र'च्या उपाध्यक्ष पदावरून उचलबांगडी

## फडणवीसांचा एकनाथ शिंदेंना पुन्हा धक्का



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नीती आयोगाच्या धर्तीवर स्थापन करण्यात आलेल्या 'महाराष्ट्र इन्फॉर्मेशन अँड ट्रान्सफॉर्मेशन' संस्थेच्या अर्थात 'मित्र'च्या उपाध्यक्षपदावरून अजय अशर यांची उचलबांगडी केली आहे. अजय अशर हे शिवसेना नेते तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय आहेत. या दोघांची घनिष्ठ मैत्रीही आहे. त्यामुळे अशर यांना हटवून फडणवीस यांनी एकप्रकारे शिंदे यांनाच धक्का दिला आहे.

महायुती सरकारमध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यात शीतयुद्ध सुरू असल्याची चर्चा आहे. शिंदे यांच्या काळातील अनेक निर्णय फडणवीस सरकारने बदलले आहेत. यामुळे शिंदे नाराज झाल्याची माहिती आहे. पण त्यानंतरही फडणवीसांचे धक्कातंत्र संपले नाही. त्यांनी आता मित्रच्या नियमित मंडळावरून एकनाथ शिंदे यांचे विश्वासू अजय अशर यांची हकालपट्टी केली आहे. त्यांच्या जागी मंत्री दिलीप वळसे पाटील, राणा जगजितसिंह पाटील, राजेश क्षीरसागर यांची उपाध्यक्ष म्हणून नव्याने नियुक्ती केली आहे. याशिवाय त्यांनी मुख्य सचिवासह इतर महत्त्वाचे सिंचन संचालक म्हणूनही नियुक्ती केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या या निर्णयाची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा आहे.

### कोण आहेत अजय अशर?

उल्लेखनीय बाब म्हणजे केंद्र सरकारच्या नीती आयोगाच्या धर्तीवर राज्यात मित्रची स्थापना करण्यात आली होती. त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी त्याच्या उपाध्यक्षपदी अजय अशर यांची नियुक्ती केली होती. अजय अशर हे ठाण्यातील सुप्रसिद्ध बिल्डर आहेत. शिंदे यांच्या बालेकिल्ला असणाऱ्या ठाण्यात त्यांनी अनेक निवासी संस्था बांधल्या आहेत. अशर हे काँग्रेसचे माजी नगरसेवक मनोज शिंदे यांचे मित्र होते. पण २००० मध्ये ते शिंदेंच्या मदतीने शिवसेनेत सक्रिय झाले. दिवंगत आनंद दिघे यांच्यामुळे एकनाथ शिंदे सभागृह नेतेपदी पोहोचले. त्यावेळी अशर यांनी शिंदेंसोबत जवळीक साधली.

एकनाथ शिंदे आमदार झाल्यानंतर ही जवळीक घनिष्ठ मैत्रीमध्ये रुपांतरीत झाली. त्यानंतर ठाण्यातील अनेक महत्त्वाचे प्रकल्प व रिडेव्हलपिंगचे प्रोजेक्ट अशर यांना प्राधान्यक्रमाने मिळण्यास सुरुवात झाली.

त्यानंतर शिंदे यांनी आपल्या काळात त्यांची मित्रच्या उपाध्यक्षपदी नियुक्ती केली होती.

# मनरेगातील तांत्रिक अधिकाऱ्यांच्या मागण्यांबाबत महत्त्वपूर्ण बैठक

## सुधीर मुनगंटीवार यांचा पुढाकार ; रोहयो मंत्री गोगावलेंचे आश्वासन

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७:** राज्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत पॅनल तांत्रिक अधिकाऱ्यांनी त्यांच्या विविध मागण्यांसाठी राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन दिले होते. गेल्यावर्षी ऑक्टोबरमध्ये झालेल्या बैठकीत निर्णय न झाल्यामुळे संघटनेने आ. मुनगंटीवार यांच्याकडे धाव घेतली. मुनगंटीवार यांनी त्याची तात्काळ दखल घेत राज्याचे रोजगार हमी मंत्री भरत गोगावले यांना बैठक बोलावण्यासंदर्भात निवेदन दिले. मंत्री महोदयांनी त्याची तातडीने दखल घेत बैठक आयोजित केली. मुनगंटीवार यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत मंत्री गोगावले यांनी लवकरच निर्णय घेण्याचे आश्वासन दिले. तसेच अधिकाऱ्यांना देखील यासंदर्भात स्पष्ट निर्देश दिले.



पॅनल तांत्रिक अधिकाऱ्यांच्या संघटनेच्या ७ प्रमुख मागण्यांसंदर्भात मंत्री गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे बैठक पार पडली. यावेळी पॅनल तांत्रिक अधिकाऱ्यांसंदर्भात मांडलेल्या विविध प्रश्नांसंदर्भात कोणावरही अन्याय व नुकसान न करता सकारात्मक निर्णय घेण्यासंदर्भात रोजगार हमी योजना व फलोत्पादन मंत्री गोगावले यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला.

यापूर्वी दि. ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत पी.टी.ओ कर्मचाऱ्यांच्या मागण्यांवर कोणतीही चर्चा झाली नव्हती. त्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण हमी योजना, तांत्रिक अधिकारी संघटनेचे अध्यक्ष सतिश वाढई यांनी आमदार सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे निवेदन दिले. तसेच स्वतंत्र बैठक घेण्याची मागणी केली होती. त्यानंतर गुरुवारी झालेल्या बैठकीत पी.टी.ओ अधिकाऱ्यांच्या समस्या आणि मागण्यांबाबत सविस्तर चर्चा झाली. मंत्री गोगावले यांनी कोणावरही अन्याय होणार नाही आणि सकारात्मक निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन दिले.

### मुनगंटीवार यांचे मानले आभार

आमदार मुनगंटीवार यांनी निवेदनाची तात्काळ दखल घेत मंत्री महोदयांपर्यंत आपले म्हणणे पोहोचवे, यासाठी संघटनेने त्यांचे आभार मानले आहे. निवेदनाची दखल घेण्यापासून बैठक लावण्यापर्यंत मुनगंटीवार यांनी पुढाकार घेतल्यामुळेच मंत्री महोदयांकडून मागण्यांच्या संदर्भात सकारात्मक भूमिका व्यक्त करण्यात आली, या शब्दांत संघटनेने कृतज्ञता देखील व्यक्त केली आहे.

# पंकजा मुंडेंनी घेतली धनंजय मुंडे यांची भेट

## सातपुडा बंगल्यावर दीड तास चर्चा

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** संतोष देशमुख हत्या प्रकरणी कॅबिनेट मंत्री धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला. यानंतर पंकजा मुंडेंनी धनंजय मुंडेंची भेट घेतली आहे.

धनंजय मुंडेंच्या सातपुडा बंगल्यावर दोघांमध्ये दीड तास चर्चा झाली आहे. त्यामुळे या भेटीकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.



दरम्यान गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे हे आजारी आहेत. धनंजय मुंडे यांच्या डोळ्याची शस्त्रक्रिया नुकतीच पार पडली. त्यांच्यावर रिलायन्स रुग्णालयात उपचार सुरु होते. या आजारामुळे त्यांना सलग दोन मिनिटेही व्यवस्थित बोलताही येत नव्हते.

त्यांनी स्वत: ट्विट करत याबद्दलची माहिती दिली होती धनंजय मुंडे यांची प्रकृती बरी नसल्याने भेट घेतल्याचे बोलले जात आहे. धनंजय मुंडे हे गेल्या काही दिवसांपासून आजारी आहेत. त्यांच्या डोळ्यांवर शस्त्रक्रियादेखील करण्यात आली आहे. तसेच त्यांना बेल्स पाल्सी आजाराचा सामना करावा लागत आहे. त्यांच्या या कठीण काळात त्यांच्यावर संतोष देशमुख प्रकरणात गंभीर आरोप झाले. तसेच त्यांचा जवळचाच व्यक्ती या प्रकरणात मुख्य आरोपी असल्याचं समोर आल्याने त्यांच्या अडचणी वाढल्या. या प्रकरणातील फोटो समोर आल्यामुळे त्यांच्यावर राजीनाम्यासाठी दबाव वाढला अखेर त्यांना राजीनामा द्यावा लागला.

धनंजय मुंडे यांनी त्यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्याची माहिती सोशल मीडियावर पोस्ट करून दिली होती. यानंतर पंकजा मुंडे म्हणाल्या की, धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाला आहे. मी त्याचे स्वागत करते. हा राजीनामा फार आधी व्हायला पाहिजे होता. या राजीनाम्यापेक्षा शपथच व्हायला नको होती.

# नार-पारगिरणा नदीजोड प्रकल्पाची निविदा काढली

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** नाशिक व जळगाव या जिल्ह्यांना सिंचनाचा फायदा करून देणाऱ्या नार-पार गिरणा नदी जोड प्रकल्पास शासनाने मान्यता दिली होती. आता त्याची पुढील प्रक्रिया सुरू करण्यात आली असून त्याची निविदा काढण्यात आली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधानसभेत दिली आहे. या प्रकल्पासाठी एकूण ७ हजार १५ कोटी २९ लाख रुपये खर्च आला आहे.



नार-पार गिरणा नदी जोड प्रकल्पाच्या माध्यमातून ९.१९ टीएमसी पाणी उचलून १४.५६ किमी बोगद्याद्वारे गिरणा नदी पात्रात चणकापूर धरणाच्या बाजूस पाणी सोडण्यात येईल. यामुळे ४९ हजार ७६१ क्षेत्र सिंचित होणार आहे. विधानसभेत राज्यपालांच्या अभिभाषण ठरावावारील चर्चेला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी याबाबत माहिती दिली आहे. तसेच राज्यातील सिंचनाच्या कामांबाबत देखील मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आपण राज्यात सिंचनाच्या क्षेत्रात मोठे काम गेल्या काही वर्षात करत आहोत. १६० प्रकल्पांना फेर प्रशासकीय मान्यता दिली आहे. सिंचनाचे प्रकल्प वेगाने सुरु आहोत. राज्याला दुष्काळमुक्त करण्यासाठी जलयुक्त शिवार-२ही योजना आणली. नदीजोड प्रकल्पही आपण हाती घेतला आहे. मराठवाड्यात सिंचनाची कामे मोठ्या प्रमाणात सुरू आहे. मराठवाड्यात सिंचन आणि पिण्यासाठी मोठ्या प्रमाणावर पाणी सुरू होणार आहे. संभाजीनगर आणि जालना हे औद्योगिक क्लस्टर होणार आहे. त्यामुळे या जिल्ह्यात पाण्याची गरज भासणार आहे. नदीजोड प्रकल्पामुळे त्याला फायदा होणार आहे.

## वादग्रस्त अधिकारी समीर वानखेडे यांची बदली रद्द



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** कॉर्डेलिया क्रूझवरील रेव्ह पार्टी प्रकरणी वादग्रस्त ठरलेले समीर वानखेडे यांची चेन्नईला झालेली बदली कॅट अर्थात केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाने रद्दबातल केली आहे. कॅटने या प्रकरणी महसूल विभागाने बदलीसंदर्भात स्वत:च तयार केलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन केल्याचा ठपका ठेवला आहे. कॅटच्या या निर्णयामुळे वानखेडे यांना जबर झटका बसला आहे. समीर वानखेडे हे मुंबईमध्ये एनसीबीचे विभागीय संचालक म्हणून कार्यरत होते. त्यांच्या नेतृत्वात कॉर्डेलिया क्रूझ ड्रग्ज प्रकरणात अभिनेता शाहरूख खान याचा मुलगा आर्यन खान याला अटक करण्यात आली होती. नंतर त्यांच्यावर खान कुटुंबीयांकडून २५ कोटींची मागणी केल्याचा आरोप झाला होता. त्यानंतर ३० मे २०२२ रोजी त्यांची चेन्नई येथील महसूल विभागात अतिरिक्त आयुक्त म्हणून बदली झाली होती. पण आता केंद्रीय प्रशासकीय न्यायाधीकरणाने त्यांची बदली रद्दबातल केली आहे. कॅटने या प्रकरणी वानखेडे यांची बदली करताना मार्गदर्शक सूचनांचे स्पष्ट उल्लंघन झाल्याचा ठपका ठेवला आहे.

### बदली करताना मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन

न्यायमूर्ती रणजीत मोरे व सदस्य राजिंदर कश्यप यांच्या नेतृत्वातील कॅटच्या खंडपीठाने हा निर्णय दिला आहे. महसूल विभागाने समीर वानखेडे यांची बदली करताना स्वतःच तयार केलेल्या मार्गदर्शक तत्वांचे उल्लंघन केले. वित्त मंत्रालयाच्या महसूल विभागाने जारी केलेल्या संबंधीच्या बदली आदेशात त्रुटी व पक्षपात निष्पन्न झाला आहे. सरकारी अधिकाऱ्यांना अखिल भारतीय सेवेचे बंधन असले तरी बदली धोरण निष्पक्ष, पारदर्शक व न्याय पद्धतीने राबवले जावे. तसेच जोपर्यंत मनमानीपणे अथवा नियमांचे उल्लंघन कुणी करत नाही तोपर्यंत न्यायालयाने त्यात हस्तक्षेप करू नये, अशी टिप्पणीही कॅटने या प्रकरणी नोंदवली आहे.

# पुरवणी मागण्यातून सरकारच्या तिजीरोवर डल्ला

**राज्यावर ८ हजार कोटी रुपयांचे कर्ज**

**अंबादास दानवेंचा गंभीर आरोप**



■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई, दि. ७:** राज्यावर ८ हजार कोटी रुपयांचे कर्ज असताना सरकारने सादर केलेल्या पुरवणी मागण्यांतून सरकारच्या तिजोरीवर डल्ला मारण्याचे काम करण्यात आल्याचा आरोप विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी सरकारने सादर केलेल्या पुरवणी मागण्यांवरील त्यांच्या भाषणात केला. सरकार मोठं मोठया घोषणा करत मात्र प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी करत नसल्याचा आरोपही त्यांनी केला आहे. राज्याची विस्कटलेली आर्थिक घडी स्थिर करायची असल्यास लोकप्रिय योजनांच्या मागे सरकारने जाऊ नये, अशी सूचनाही दानवे यांनी केली. सरकारने निधी वाटपात केलेली असमानता, रखडलेले प्रकल्प याबाबत मुद्दे मांडत दानवे यांनी सरकारने सादर केलेल्या पुरवणी मागण्यांवर टीकेची झोड उठवली.

सरकारने ६ हजार ४८६ कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. त्यातील २ हजार १३३ कोटी रुपयांच्या रक्कमा या केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाअंतर्गत असलेल्या योजनांसाठी केला असल्याचा आरोपही दानवे यांनी केला. पंतप्रधानांच स्वप्नं असलेलं स्किल इंडिया म्हणजेच कौशल्य विभागाच्या योजना या आधुनिक भारताच्या निर्मितीसाठी आवश्यक असतानाही त्याकडे दुर्लक्ष केलं गेल आहे. जलसंपदा विभागामध्ये २७ हजार कोटी रुपये असताना त्यातून १४ हजार कोटी रुपये सुद्धा खर्च झाले नाहीत. जीवन मिशनच्या जिल्हा परिषद आणि जीवन प्राधिकरण अंतर्गत ९४५ योजना प्रस्तावित असताना त्यासाठी मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असताना २९ हजार कोटी रुपयांची मागणी असूनही कमी निधीची तरतूद करण्यात आली. सरकारने सरपंचांचे मानधन दुपटीने करण्याची घोषणा केली मात्र त्यांच्या खात्यात पैसे जमा केले नाही. परभणी जिल्ह्यातील वैद्यकीय महाविद्यालयाचा प्रस्ताव धूळखात पडलं आहे.

समान शिक्षण हक्क कायद्या अंतर्गत मोफत शिक्षण असताना त्यासाठीची निधी देण्यात आली नाही. सावित्रीबाई फुले यांच स्मारक सातारा जिल्ह्यात उभारण्यासाठी १० हजार कोटी रुपये खर्च करण्याची घोषणा केली मात्र एक वीट ही रचली नाही. पोलिसांच्या निवासाचा विषय आजही कायम आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हर घर छत ही संकल्पना २०२२ साली मांडली होती. तरी अद्याप घरकुल योजनेचे १० टक्केही काम पूर्ण झाले नसून लाभार्थ्यांची रक्कमही कमी केली. ४ साखर कारखान्यांनी निधीची मागणी करूनही मंत्रिमंडळातील एकाच साखर कारखान्याला देण्याचा प्रस्ताव असल्याची माहिती त्यांनी सभागृहाला दिली. सिडकोने स्वस्तात घर देण्याची घोषणा केली मात्र प्रत्यक्षात कंत्राटदारांच्या हितासाठी अधिक दर आकारले.



# आझमी हे महाविकास आघाडीचाच भाग

## संजय निरुपम यांची टीका

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७:** शिवसेना शिंदे गटाचे नेते संजय निरुपम यांनी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्यावर टीका केली आहे. अबू आझमी यांनी केलेल्या वादग्रस्त विधानावर प्रतिक्रिया देताना संजय निरुपम यांनी उद्धव ठाकरे यांच्यावर निशाणा साधला आहे. उद्धव ठाकरे यांची शिवसेना अबू असीम आझमी यांचा उघडपणे निषेध करू शकत नाही, असे संजय निरुपम म्हणाले आहेत. संजय निरुपम म्हणाले, सर्वप्रथम, उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी हे मान्य करावे की अबू असीम आझमी हे महाविकास आघाडीचा भाग आहेत. जेव्हा आझमी यांनी निवडणूक लढवली तेव्हा उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या शिवसेनेने त्यांना पाठिंबा दिला होता आणि उद्धव ठाकरे यांनी स्वतः शाल देऊन त्यांचे स्वागत केले. जर आपण एकनाथ शिंदेंबद्दल बोलत असू, तर जर कोणी विरोधी पक्षातून असेल तर त्यांना भेटण्यात काहीच गैर नाही. एका कार्यक्रमात टेबलावर बसलो होतो. पण याचा अर्थ असा नाही की आपण त्याला विरोध करणार नाही. उद्धव ठाकरेंची शिवसेना अबू असीम आझमी यांचा उघडपणे निषेध करू शकत नाही. कारण जर त्यांनी निषेध केला तर त्यांच्या मुस्लिम मतांना बाधा येईल. यावेळी बोलताना संजय निरुपम यांनी काँग्रेसवर देखील निशाणा साधला आहे. संजय निरुपम म्हणाले, मुंबई काँग्रेस कार्यालयाला लवकरच टाळे लागणार आहे. पी. डब्ल्यू. डी. आवारात असलेल्या काँग्रेस कार्यालयाचे १८ लाख भाडे सरकारला दिलेले नाही. मागील अनेक महिन्याचे वीज बिल न भरल्यामुळे वीज कंपनीने मीटर काढून नेले आहे. काँग्रेस कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना सहा महिन्यापासून पगार नाही. शिवसेना ठाकरे गटासोबत युती केल्यामुळे काँग्रेस संपली, असेही संजय निरुपम म्हणाले. पुढे बोलताना संजय निरुपम म्हणाले, मुंबईत फक्त तीन आमदार निवडून आलेत तेही मुस्लिम मतांमुळेच निवडून आले आहेत. काँग्रेसचे नेते काल मुंबईत यूट्यूबसाठी व्हिडिओ बनवण्यासाठी आले होते असे म्हणत त्यांनी राहुल गांधी यांना देखील टोला लगावला आहे. अनेक मुस्लिम आता शिवसेना ठाकरे गटाकडे गेले आहेत. मल्लिकार्जुन खरगे प्रचंड जातीवादी असून वेणुगोपाल देखील अकार्यक्षम आहेत, असा आरोपही यावेळी निरुपम यांनी केला आहे.

# राज्यातील नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी टास्कफोर्स पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** महाराष्ट्रातील नद्यांचे प्रदूषण हा गंभीर विषय असून, ५०% उद्योगांकडून प्रक्रिया न केलेले सांडपाणी थेट नद्यांमध्ये सोडले जाते. यामुळे पाणी प्रदूषणाच्या समस्येत मोठी वाढ झाली आहे. यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी पर्यावरण, नगरविकास आणि जलसंपदा या खात्यांचा समावेश असलेला एक संयुक्त टास्कफोर्स स्थापन करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्याच्या पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे यांनी विधानसभेत दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा टास्कफोर्स काम करेल.

### नद्यांचे वाढते प्रदूषण गंभीर समस्या

विधानसभेत पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातून वाहणाऱ्या मुळा-मुठा नद्यांमध्ये थेट मैला पाणी सोडले जाते आणि उद्योगधंद्यांमधील सांडपाणी प्रक्रिया न करता सोडल्याने प्रदूषणात मोठी वाढ होत आहे, असा मुद्दा आमदार बापूसाहेब पठारे आणि शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून उपस्थित केला. उद्योगांकडून सिव्हरेज ट्रीटमेंट प्लांट (एसटीपी) बसवले जातात, परंतु योग्य देखभालीच्या अभावामुळे ते कार्यक्षम राहत नाहीत.

परिणामी, प्रक्रिया न झालेल्या पाण्यामुळे नद्यांचे प्रदूषण दिवसेंदिवस वाढत आहे.

### प्रदूषण करणाऱ्या उद्योगांवर कठोर कारवाई

पर्यावरण विभागाकडून अशा उद्योगांना सातत्याने नोटिसा बजावून कारवाई केली जाते. मात्र, फक्त नोटिसा देऊन समस्या सुटणार नाही, तर प्रदूषण रोखण्यासाठी व्यापक प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे, असे पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले.

नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठी वेगवेगळ्या सरकारी विभागांचा समन्वय आवश्यक आहे. त्यामुळे नगरविकास, पर्यावरण आणि जलसंपदा विभागांचा समावेश असलेला टास्कफोर्स तयार केला जाणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली हा टास्कफोर्स कार्यान्वित होणार असून, आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सांडपाणी प्रक्रिया सुधारण्यावर भर दिला जाईल.

# अनधिकृत होर्डिंगमुळे अपघात झाल्यास मंत्री जबाबदारी घेणार का?

## विजय वडेट्टीवार यांचा सरकारला सवाल

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** मुंबईत अपघात झाल्यानंतर महायुती सरकार जागे झाले. पण फक्त मुंबईत होर्डिंग्ज प्रश्न नाही तर राज्यातही अनधिकृत होर्डिंग्ज वाढलेले आहे. यामुळे अपघात होण्याची शक्यता आहे. नागभिड तालुक्यात मोठे होर्डिंग असून ते कोसळले तर मोठा अपघात होईल. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्रातील होर्डिंग्ज ऑडिट होणार का, आणि एखादी घटना घडल्यास मंत्री जबाबदार असतील का असा प्रश्न काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवर यांनी विधानसभेत उपस्थित केला. राज्यात ४०२६ ठिकाणी होर्डिंगचे ऑडिट करण्यात आले आहे. राज्यात एकूण १ लाख ४३८७ होर्डिंग्ज काढून टाकण्यात आली आहे. विधान सभेत प्रश्नोत्तराच्या काळात विजय वडेट्टीवार यांनी विचारलेल्या प्रश्नाला मंत्री उदय सामंत यांनी उत्तर दिले. राज्यात एकूण ४०२६ ठिकाणी होर्डिंग्जचे ऑडिट करण्यात आले. १८८ ठिकाणी ऑडिट झाले नाही.राज्यात १ लाख ४३८७ होर्डिंग्ज काढून टाकण्यात आले आहे, याप्रकरणी ज्यांनी सहकार्य केले नाही त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले. असे एकूण ५४ गुन्हे दाखल झाले आहे. महापालिका क्षेत्रात ४८ गुन्हे तर नगरपालिका क्षेत्रात ११ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. एकूणच अनधिकृत होर्डिंग्ज बाबत दरवर्षी राज्यात ऑडिट केले जाणार असे आश्वासन मंत्री उदय सामंत यांनी दिले. यावर्षीचे होर्डींग्जचे ऑडिट अर्थसंकल्पीय अधिवेशन संपल्यावर सुरू केले जाईल अशी माहिती मंत्री सामंत यांनी सभागृहाला दिली.



# जेनेरिक औषधांमुळे रुग्णांच्या पैशांची बचत: खा. अशोकराव चव्हाण

■ **महासागर प्रतिनिधी,**
**मुंबई , दि. ७ :** जेनेरिक औषधांचा दर्जा उत्तम असून, त्यांच्या किंमतीही कमी आहेत. सर्वसामान्य गरीब कुटुंबांना मदत व्हावी आणि उपचार स्वस्त व्हावेत, यासाठी २०१४ मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जनऔषधी योजना सुरू केली होती. ही योजना अतिशय लोकोपयोगी असून, जेनेरिक औषधांच्या वाढत्या उपलब्धतेमुळे रुग्णांच्या पैशांची बचत होत असल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. जनऔषधी दिनानिमित्त त्यांनी आज मुंबईच्या कामा हॉस्पिटल परिसरातील सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ संचालित जेनेरिक औषधांच्या प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी केंद्राला भेट दिली. यावेळी प्रतिक्रिया व्यक्त करताना ते बोलत होते. या भेटीप्रसंगी हॉस्पिटलचे अधीक्षक डॉ. तुषार पालवे, सुपारीबाग ग्राहक संघाचे अध्यक्ष किशोर देसाई, केंद्र संचालक संतोष चन्ना, प्रधानमंत्री जनऔषधी योजनेच्या समन्वयक हेमांगी नेगी आदी उपस्थित होते. खा. चव्हाण यांनी या भेटीत केंद्र संचालकांशी, डॉक्टरांशी तसेच रुग्णांशी संवाद साधला.

ते पुढे म्हणाले की, या योजनेमध्ये सर्वांना परवडणाऱ्या किंमतीत दर्जेदार जेनेरिक औषधे उपलब्ध व्हावीत आणि जेनेरिक औषधांना प्रोत्साहन देण्यासाठी मागील ११ वर्षात देशातील जिल्ह्यांमध्ये १५ हजारांहून अधिक प्रधानमंत्री भारतीय जनऔषधी केंद्रे उघडण्यात आली आहेत. 'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २०१४ मध्ये दरवर्षी ७ मार्च रोजी जनऔषधी दिवस साजरा करण्याची घोषणा केली होती. तेव्हापासून हा दिवस आरोग्याविषयी जागरूकता वाढवण्यासाठी जनऔषधी दिवस म्हणून साजरा केला जातो. रुग्णांनी जेनेरिक औषधांचा वापर वाढवावा, असे आवाहन देखील त्यांनी याप्रसंगी केले.

महासागर
शनिवार, दि. 8 मार्च 2025
अमरावती
पान 3

# गरोदर महिलेच्या पोटातील नसच कापली?

## अचलपूर उपजिल्हा रुग्णालयातील प्रकार ■ पोलिसात तक्रार दाखल

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी,( दि.7 )-** तालुक्यातील कसबे गव्हाण येथील रहिवासी 32 वर्षीय सुमैया बानो अब्दुल कलाम यांचा प्रसूतीदरम्यान मृत्यू झाला. डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे हा मृत्यू झाल्याच आरोप केल्या जात आहे. ज्यामुळे परिसरातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.




कसबे गव्हाण येथील रहिवासी सुमय्या बानो अब्दुल कलाम नावाच्या महिलेला 18 फेब्रुवारी रोजी अचलपूर उपजिल्हा रुग्णालयामध्ये प्रसूतीसाठी दाखल करण्यात आले होते. तपासणीनंतर डॉ. मंगला राठी आणि संबंधित कर्मचाऱ्यांनी महिलेवर सिझेरियन ऑपरेशन केले आणि बाळाला जन्म दिला ज्यामध्ये महिलेने एका मुलाला जन्म दिला. ऑपरेशन दरम्यान महिलेच्या पोटातील नस कापली गेली, ज्यामुळे महिलेच्या पोटात वेदना होऊ लागल्या, ज्याची माहिती महिलेने आणि तिच्या कुटुंबीयांनी डॉक्टर आणि तैनात कर्मचाऱ्यांना दिली. त्यावर डॉक्टरांनी सांगितले की हे नेहमी घडत असते, काळजी करू नका, सर्व काही ठीक आहे, परंतु दिवसेंदिवस महिलेची प्रकृती खालावत गेली. तरीही तिला अमरावती येथे उपचारासाठी रेफर करण्याऐवजी, चार दिवस तेथे उपचार सुरू ठेवून वेळ वाया घालवला. महिलेला वेदना होत राहिल्या, तरीही तिला योग्य उपचार देण्यात आले नाहीत. महिलेची प्रकृती अत्यंत गंभीर असताना, तिला 21 फेब्रुवारी रोजी जिल्हा रुग्णालय अमरावती येथे रेफर करण्यात आले. महिलेची प्रकृती चिंताजनक होती, तेथील महिलेला आवश्यक असलेल्या सुविधा लक्षात घेऊन जिल्हा रुग्णालयाच्या अधिकाऱ्यांनी तिला चांगल्या रुग्णालयात उपचार करण्याचा सल्ला दिला. त्यानंतर रेडियंट त्या महिलेला अमरावती येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले.



डॉक्टरांनी तिला रक्त चढवले, परंतु महिलेच्या शरीरात रक्त पचत नसल्याने, तेथील डॉक्टरांनी तिची तपासणी केली आणि महिलेच्या प्रसूतीदरम्यान पोटातील एक रक्तवाहिनी कापल्याचे आढळले. त्यामुळे रुग्णालयात पुन्हा शस्त्रक्रिया करून महिलेचा जीव वाचवण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु दुसऱ्या दिवशी महिलेचा मृत्यू झाला. कुटुंबाने त्या रुग्णालयातील डॉक्टरांना मृत्यूचे कारण विचारले असता, डॉक्टरांनी सांगितले की, महिलेची अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयात प्रसूती होत असताना पोटातील एक रक्तवाहिनी कापल्यामुळे जास्त अंतर्गत रक्तस्त्राव झाला होता.

### त्या डॉक्टरांना बडतर्फ करा!

अचलपूर येथील उपजिल्हा रुग्णालयामध्ये प्रसूती करताना डॉक्टरांच्या निष्काळजीपणामुळे पोटातील कापलेल्या रक्तवाहिनीला न जोडता पोटात टाके घालण्यात आले. चांदूर बाजार तालुक्यातील ब्राह्मणवाडा थडी येथील रहिवासी असलेल्या महिलेच्या भावाने डॉक्टर मंगला राठी आणि संबंधित कर्मचारी आणि उपजिल्हा शल्यचिकित्सक अधीक्षक यांच्या निष्काळजीपणामुळे आणि दुर्लक्षामुळे महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप केला आहे. 5 मार्च रोजी अचलपूर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली होती, ज्याची पोलिसांकडून चौकशी सुरू आहे. पोलिसांनी चौकशीनंतर कारवाई करण्याचे आश्वासन दिले आहे. आणि या प्रकरणाची तक्रार मुख्यमंत्री, आरोग्यमंत्री आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे करून डॉक्टरची पदवी रद्द करण्याची आणि डॉक्टर आणि संबंधित कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना सेवेतून बडतर्फ करण्याची तक्रार करून न्याय मागण्यात आला आहे.

### बेजबाबदारपणाचे केंद्र

अचलपूरचे उपजिल्हा रुग्णालय हे निष्काळजीपणाचे केंद्र बनले आहे. रुग्णांवर उपचार करताना निष्काळजीपणा आणि दुर्लक्ष दिसून येते. रुग्णालयाच्या व्यवस्थेत वाळवीचा प्रादुर्भाव झाला आहे. रुग्णांना आवश्यक उपचारांचा अभाव आहे, ज्यामुळे रुग्ण आणि त्यांच्या कुटुंबियांना अडचणी निर्माण होतात आणि त्यांना त्रास सहन करावा लागतो. याआधीही रुग्णालयात असे प्रकार घडले आहेत, परंतु गरिबीमुळे कोणीही डॉक्टरांविरुद्ध तक्रार करण्यास धजावित नाही, ज्यामुळे रुग्णालयातील डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांचे मनोबल दिवसेंदिवस वाढत आहे. असे असूनही, वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष न दिल्यामुळे, गरीब कुटुंबातील महिलांना जीव धोक्यात घालून उपचार करावे लागत आहेत.

# खरेदी, विक्री कार्यालयाचे शासकीय धान्य राम भरोसे

## कृ.उ.बा. समितीमधील 10 हजार पोते उचलण्यात टाळाटाळ

*महासागर प्रतिनिधी*
*अमरावती,( दि.7 )- नाफेडकडून खरेदी करण्यात आलेले सोयाबीन येथील कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये राम भरोसे पडून असल्याने दिसत आहे. या मालाकरिता जबाबदार असलेले खरेदी, विक्री कार्यालय हे 10 हजार पोते धान्य उचलण्याकरिता टाळाटाळ करित आहे. दुसरीकडे कृषी उत्पन्न बाजार समितीनेही हात वर केल्याने अवकाळी पाऊस आल्यास या धान्याचा सत्यानाश झाल्याशिवाय राहणार नाही हे तेवढेच खरे.*



शासनाने शेतकऱ्यांना त्यांच्या पिकाला हमी भाव देण्याकरिता नाफेडव्दारे धान्य खरेदी केले. ही खरेदी प्रक्रीया खरेदी, विक्री कार्यालयाव्दारे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात राबविण्यात आली. शेतकऱ्यांकडून खरेदी केलेले जवळपास 20 हजार क्विंटल सोयाबीन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या जागेवर ठेवण्यात आले आहे. यापैकी 10 हजार क्विंटल धान्य खरेदी, विक्री कार्यालयाने उचलून आपल्या शेडमध्ये नेले, मात्र अजुनही 10 हजार क्विंटल सोयाबीन कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात पडून आहे.

### अचलपूरहून परत पाठविले धान्य

माहिती आहे की, खरेदी, विक्री कार्यालयाने हे सोयाबीन उचलून अचलपूर येथील वेअर हाऊसमध्ये नेले होते, परंतू काहीतरी कारण सांगून हे धान्य परत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये पाठविण्यात आले. जागेचा अभाव हे प्रमुख कारण खरेदी-विक्री कार्यालयाकडून सांगण्यात आले आहे. याबाबत खरेदी, विक्री कार्यालयाचा कुठलाही अधिकारी बोलण्यास तयार नाही.



हा माल जवळपास एक महिन्यापासून पडून आहे. आम्हाला मोर्शी वखार महामंडळाचे वेअर हाउसमध्ये हे धान्य ठेवण्याकरिता दिले होते. परंतु तेथे गर्दी इतकी होती की, तेथे दिवसभरात एखादा ट्रक खाली केल्या जायचा. त्यानंतर अचलपूर देण्यात आले. त्या वेअर हाउसवरुन माल परत पाठविण्यात येत आहे. या मालामध्ये माती असल्याचे कारण सांगून हा माल वारंवार परत पाठविला जात आहे. मात्र वास्तवात हा माल अत्यंत चांगला आहे.

**हरिष मोरे,**
**सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती, अमरावती.**

नाफेड ने खरेदी केलेला माल तत्काळ उचलून घेऊन जाण्याबाबत आतापर्यंत खरेदी, विक्री कार्यालयाच्या व्यवस्थापकांना पाच नोटीस व स्मरणपत्र दिले. मात्र त्याचा काही एक उपयोग झाला आहे. आमची जागा अडकून पडल्याने आता शेतकऱ्यांचा तूर, हरभरा मार्केटमध्ये येत, तो कोठे ठेवावा असे धर्मसंकट आमच्या समोर उभे ठाकले आहे. तसेच या मालाची जबाबदारी किती दिवस घ्यायची हा ही प्रश्न आहे.

**दिपक विजयकर, सचिव कृषी उत्पन्न बाजार समिती, अमरावती.**

# दुचाकी झाडावर धडकून एक ठार

**अमरावती-** भरधाव दुचाकी झाडावर धडकल्याने एकाचा मृत्यू झाला. ही घटना 7 मार्च रोजी कोळविहीर ते तरोडा रस्त्यावर उघडकीस आली. चेतन नंदकुमार महानकर (वय 26, रा. तरोडा) असे मृताचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे. तरोडा येथील चेतन नंदकुमार महानकर हा 6 मार्चला सायंकाळी नातेवाईकाच्या लग्न समारंभात सहभागी होण्याकरिता जात असताना हा अपघात झाला. या अपघातात त्याचा जागेवरच मृत्यू झाला असून 7 मार्चला शाळकरी मुले शाळेत जात असताना ही घटना दिसून आली. त्यांनी याबाबतीत गावकऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर गावकऱ्यांनी घटनास्थळावर गर्दी केली. या घटनेची माहिती शिरखेड पोलिसांना मिळतात पोलिसांनी घटनास्थळ गाठून घटनेचा पंचनामा केला. मृतदेह शवविच्छेदनाकरिता रुग्णालयात पाठविण्यात आला.

# परस्पर कर्ज काढून वाहन घेऊन केला विश्वासघात

### एका तरुणीविरुध्द गुन्हा दाखल

**अमरावती** - दस्तावेजांद्वारे परस्पर कर्ज काढून एका तरुणीने मोपेड वाहन घेतले आणि महिलेचा विश्वासघात केला. या घटनेची तक्रार एका महिलेने 7 मार्च रोजी खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात दिली. त्यानुसार पोलिसांनी महाजनपुरा स्थित परदेशी पुर्यातील 33 वर्षीय महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे. महिलेच्या तक्रारीनुसार, तिची बचत गटाच्या माध्यमातून एका महिलेशी ओळख झाली होती. त्या महिलेने ओळखीचा फायदा घेऊन तक्रारदार महिलेचे दस्तावेज घेतले. त्यानंतर त्या दस्तावेजाद्वारे परस्पर फायनान्सवर 1 लाख 30 हजार रुपये किमंतीचे ज्युपीटर मोपेड वाहन खरेदी केले. हा प्रकार तक्रारदार महिलेला माहिती पडला. त्यामुळे सदर महिलेने आपला विश्वासघात केल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या घटनेची तक्रार खोलापुरी गेट पोलिस ठाण्यात दिली.

### जरुडात युवा शेतकऱ्याची आत्महत्या

**वरुड** - येथुन जवळच असलेल्या जरुड येथील प्रगतिशील शेतकरी मंगेश उर्फ पिंटू वसंतराव ठाकरे (46) या शेतकऱ्याने शेतात काल (ता.6) सायंकाळी 7वाजताच्या सुमारास गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे उघड झाले. सततची नापीकी आणि उत्पन्नापेक्षा शेतीचा खर्च जास्त त्यामुळे वाढत गेलेले कर्ज यामुळे सतत चिंतेत असलेले मंगेश ठाकरे हे शेतात गेल्यानंतर बराच वेळ होऊनही घरी परतले नसल्याने त्याच्या कुटूंबियांनी शोधाशोध केली असता, सायंकाळी शेतातच एका झाडाला गळफास घेतल्याचे निदर्शनास आले. यासंदर्भात वरुड पोलिसांना माहिती देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळ गाठून पंचनामा केला व मृतदेह शवविच्छेदनासाठी पाठविला. वरुड येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन झाल्यानंतर मृतदेह शुक्रवारी कुटूंबाच्या स्वाधीन करण्यात आला. त्यांचेवर हिंदू स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. मृतक मंगेश यांचे मागे आई, भाऊ, बहीण, 1 मुलगा, 1 मुलगी व आप्तपरिवार आहे.

# युवा शेतकऱ्याची गळफास लावून आत्महत्या

## निमगव्हाण शेतशिवारातील घटना

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर रेल्वे, ( दि. 7 )-** एका युवा शेतकऱ्याने शेतातील झाडाला गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना बुधवार, 5 मार्च रोजी रात्रीच्या सुमारास चांदूर रेल्वे तालुक्यातील व तळेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील निमगव्हाण शेतशिवारात उघडकीस आली. सागर अरविंद ठाकरे (28) रा. निमगव्हाण असे मृतकाचे नाव आहे.

सागरचा चुलत भाऊ पंकज पंढरीराव ठाकरे यांनी याबाबत तळेगाव दशासर पोलिसांकडे फिर्याद दिली. सागरचे वडील अरविंद ठाकरे यांच्याकडे निमगव्हाण शेतशिवारमध्ये 14 एकर शेती असून, सागरसुद्धा त्याच्या कुटुंबीयांसह शेती करतो. सागर ट्रॅक्टरने शेतीचे काम करीत होता. बुधवारी सकाळी शेतातील कम्पाउंड तार काढण्यासाठी तो गेला होता. तार काढुन तो दुपारच्या सुमारास




घरी आला. त्यानंतर सायंकाळी चार वाजताच्या सुमारास तो पुन्हा शेतात गेला; मात्र रात्री उशिरापर्यंत घरी परत न आल्याने संपूर्ण कुटुंबीयांनी सागरचा शोध सुरू केला. त्यावेळी सागर ठाकरे शेतातीलच आपट्याच्या झाडाला नॉयलान दोरीने गळफास लावलेल्या अवस्थेत दिसून आला. याप्रकरणी तळेगाव पोलिसांनी नोंद घेतली असून, आत्महत्येमागील नेमके कारण कळू शकले नाही. गुरूवारी चांदूर रेल्वेच्या ग्रामिण रूग्णालयात शवविच्छेदन केल्यानंतर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार गावात पार पडले.

# एसटी बसमधील महिलांच्या आसनावर पुरुषाचे अतिक्रमण


**प्रवाशी महिलांची होत आहे गैरसोय** | **8 मार्च महिला दिन विशेष** | **विशेष बसची महिलांची मागणी**

**महासागर प्रतिनिधी**
**पथ्रोट,( दि.7 )-** एसटी महामंडळाच्या बसमध्ये महिलांसाठी राखीव आसनाची व्यवस्था असली तरी या आसनांवर पुरुष प्रवासी अतिक्रमण करित असल्यामुळे महिलांना आरक्षित जागेपासून वंचित राहावे लागते. हक्काची जागा असूनही त्याचा लाभ न मिळता उभ्याने प्रवास करावा लागत असल्याने यासंदर्भाने महिला प्रवाशांकडून रोष व्यक्त करण्यात येत आहे. वाहकाने नियमबाह्य पद्धतीने महिलांचे आरक्षित आसन बळकावणार्याक पुरुष प्रवाशांना समज देवून ती जागा महिला प्रवाशाला उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे, मात्र वाहक त्याकडे दुर्लक्ष करतात, असा आरोप महिलांनी केला आहे. महिलांना आरामदायक व सुरक्षित प्रवास करता यावा, यासाठी ग्रामीण भागात महिलांसाठी स्वतंत्र बससेवा सरु करण्याची मागणीही महिला वर्गातून करण्यात येत आहे.





राज्य मार्ग परिवहन महामंडळ एसटीमध्ये लालपरी, हिरकणी, शिवशाही, शिवाई, विठाई अशा सर्व बसमध्ये महिलांसाठी त्यांच्या हक्काच्या चार जागा राखीव असतात. महिला सन्मान योजनेमध्ये प्रवासात महिलांना 50 टक्के तिकीट सवलत दिली आहे. त्यामुळे ग्रामीण भागातून महिला प्रवाशांची संख्या वाढली आहे. मात्र बहुतांश बसमध्ये उभे राहून महिलांना प्रवास करावा लागत आहे. एकीकडे संसदेत नारी शक्ती वंदना विधेयक 2023 मंजुर करुन केंद्र सरकारने महिला सशक्तीकरणाचा पुरस्कार केला तर दुसरीकडे महिलांसाठी असलेल्या सुविधांची अंमलबजावणी होत नसल्याने महिलांमधून तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. बसमध्ये वाहकच लक्ष देत नाहीत. कुठेही बसले तरी त्यांना चालते. किमान महिलांच्या जागेवर कोण बसले आहे हे तरी बघायला हवे. हल्ली सरकारने महिलांसाठी आरक्षण मंजूर केले खरे. मात्र त्याची अंमलबजावणी होते किंवा नाही सध्या तरी सांगणं कठीणच आहे. बसमधील आरक्षणावर कोण लक्ष देणार. असा प्रश्न महिला प्रवासी उपस्थित करित आहेत.



अनेक वर्षांपासून ग्रामीण भागातील मोठ्या संख्येने महिला दररोज बसने येजा करतात. महिलांसाठी राखीव सीट असलेल्या जागांवर पुरुष बसतात परंतु त्यांना उठा असं म्हणण्याची कोणत्याही महिलेची हिंमत होत नाही. एखाद्या महिला प्रवाशाने जर राखीव सीट वरून पुरुष प्रवाशांना उठवायचा प्रयत्न केला, तर पुरुष प्रवासी वाद घालतात, हुज्जत करतात. इतर प्रवासी तिच्याकडे वेगळ्याच नजरेने पाहतात, मग महिलांसाठी राखीव आसनाचा उपयोग काय, असा प्रश्न शिक्षिका रंजना ठाकरे (पोटे) यांनी उपस्थित केला.



राखीव आसनावर पुरुषांच्या अतिक्रमणामुळे त्यांच्या हक्काची जागा महिलांना मिळत नाही. काही महिलाही महिलांनाच बसायला जागा देत नाही, ही शोकंतिका आहे. माझ्या मते महिलांसह सवलत असलेल्या सर्वांकरीता विशेष बसेसची व्यवस्था करावी. असे मत वासनी येथील सरपंचा अवंतिका वाटाणे यांनी व्यक्त केले.



राखीव जागांचे सोडा हल्ली बसमध्ये बहुतांश महिलांना जागाच मिळत नाही. महिला प्रवासी वाढल्या, त्यावर आता पुरुषही महिलांच्या राखीव जागा न पाहता बसतात. त्यांना कोण आवरणार? महिलांनी काही म्हटले की, वाद घालतात. त्यामुळे महिलांना उभे राहून प्रवास करावा लागतो, असे नियमित बसने प्रवास करणार्या मिना नितीन दुर्बुडे यांचे म्हणणे आहे.


## नगर परिषद कार्यालय, दर्यापूर

**जाहीर प्रसिद्धीकरण**
**सन २०२५-२६**

**निविदा सुचना क्रं ५८७८/२०२५** **दिनांक ७/३/२०२५**

राज्यातील पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समायोजित लोकसेवा देण्याकरिता तसेच लोकांच्या स्थानिक प्रशासनाकडून वाढत्या अपेक्षा विचारात घेऊन त्यांना तत्पर व दर्जेदार सेवा पुरविण्याच्या दृष्टिकोनातून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ दिनांक २८/०४/२०१५ रोजी लागू करण्यात आला आहे. ज्या लोकसेवा दर्यापूर नगर परिषदेमार्फत देण्यात येतात त्या लोकसेवा हक्क अध्यादेश २०१५ कलम ३ (अ) अन्वये सदर लोकसेवांची सूची, आवश्यक कागदपत्र, फी, नियतकालमर्यादा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम अपिलीय अधिकारी व द्वितीय अपिलीय अधिकारी यांची यादी खालील लिंक वर पहाण्यास उपलब्ध आहे.

https://drive.google.com/file/d/1s6R_yjqqqJQfKKekmAokt8Bd41KZGY_Y/view?usp=driv e link

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद दर्यापूर**
**जि. अमरावती**


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# स्त्री शक्तीला मानाचा मुजरा..



*स्त्री म्हणजे जन्मदाती*
*स्त्री म्हणजे संस्कृती*
*स्त्री म्हणजे नाविन्याचा वसा*
*स्त्री म्हणजे घराच घरपण*
*स्त्री म्हणजे महान कार्य*

आज ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त या स्त्री शक्तीला मानाचा मुजरा. आजची स्त्री ही कुणापेक्षाही कमी नाही, कोणत्याही कामात ती मागे नाही. चुल आणि मुल सांभाळून ती पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करत आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांना घडवून स्वतंत्र स्वराज्य निर्माण करुन देण्यासाठी केलेल्या संघर्षाचे दर्शन देणाऱ्या राजमाता जिजाऊ, मै मेरी झांशी कभी नही दुंगी असे ठमकावून इंग्रजांशी संघर्ष करणारी राणी लक्ष्मीबाई आणि स्त्री शिक्षणाची महती ओळखून मुलींना, स्त्रियांना शिक्षणाची दारे खुली करुन देणाऱ्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, आकाशात भरारी घेणाऱ्या कल्पना चावला यांच्या सारख्या सर्व कर्तृत्ववान स्त्रियांच्या कार्याला जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने वंदन.

या दिवसाची खरी सुरुवात स्त्रियांच्या सामुहिक प्रयत्नांनी अमेरिकेत १९०८ मध्ये झाली. अमेरिका आणि युरोपसहित जवळजवळ जगभराच्या स्त्रियांना विसाव्या शतकाच्या सुरुवातीपर्यंत मतदानाचा हक्क नाकारलेला होता. पुरुषप्रधान व्यवस्थेतील स्त्री-पुरुष विषमतेचे हे एक ढळढळीत उदाहरण. या अन्यायाविरुद्ध स्त्रिया आपापल्यापरीने संघर्ष करीत होत्या. त्यामध्ये क्लारा झेटकिन या कार्यकर्तीने सार्वत्रिक मतदानाचा हक्क मिळण्यासाठी संघर्ष करणे हे समाजवादी स्त्रियांचे कर्तव्य आहे अशी घोषणा केली.

८ मार्च १९०८ मध्ये न्युयॉर्कमधील कपडयाच्या कारखान्यात काम करत असलेल्या महिलांना काम जास्त पण मजुरी कमी मिळायची या कारणामुळे त्यांनी लढा पुरकारला, दहा तासांचा दिवस आणि कामाच्या जागी सुरक्षितता तसेच मतदानाचा हक्क मिळावा, अशा मागण्याही जोरकसपणे केल्या.

स्त्रियांनी संघटित होऊन स्वतःचा अधिकार मागण्यासाठी केलेला हा संघर्ष जगाच्या इतिहासातील पहिला संघर्ष मानला जातो. ८ मार्च १९०८ या दिवसाला ऐतिहासिक कामगिरीच्या स्मरणार्थ जागतिक महिला दिन म्हणून स्विकारावा, असा जो ठराव मांडला तो पास होऊन त्याला मान्यता मिळाली. आपल्या भारत देशात ० मार्च १९४३ रोजी मुंबई येथे पहिल्यांदा महिला दिवस साजरा करण्यात आला.

*तुझ्या उत्तुंग भरारी पुढे*
*गगन ही ठेंगणे भासावे*
*तुज्या विशाल पंखाखाली*
*विश्व ते सारे वसावे*

आजचा हा दिवस सन्मानाचा, अभिमानाचा दिवस असून तो उत्साहाने साजरा केला जातो. सर्वत्र कर्तृत्ववान आणि समाजात मोलाचे काम करणाऱ्या तसेच गृहोद्योग चालविणाऱ्या महिलांचा सत्कार केला जातो. त्यांना त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी प्रोत्साहन दिले जाते.

आपल्या संस्कृतीमधील स्त्रीचे समाजातील दुय्यमस्थान काही अंशी अस्पष्ट होत आहे. आज भारतातील स्त्री प्रत्येक क्षेत्रामध्ये प्रगतीपथावर आहे. असं एकही क्षेत्र नाही ज्या क्षेत्रामध्ये महिलेने प्रवेश केला नाही. शेतातील मजुरापासून ते देशाच्या राष्ट्रपती पदापर्यंत तसेच सरपंचापासून पंतप्रधान पदापर्यंत शिक्षिका, डॉक्टर, पोलिस, पोलिस निरीक्षक, तलाठी, ग्रामसेविका, पायलट, खेळाडू अशा अनेक क्षेत्रात मजल मारत महिलांनी कर्तृत्व सिध्द केले आहे.

आपल्या भारताच्या पहिल्या महिला पंतप्रधान इंदिरा गांधी, राष्ट्रपती पदी निवड झालेल्या महिला प्रतिभाताई पाटील, पोलीस सेवेत अधिकारी असलेल्या किरण बेदी, भारतरत्न किताबाच्या मानकरी गानसम्राज्ञी लता मंगेशकर, पी. टी. उषा सारख्या अनेक महिलांनी क्रिडाक्षेत्रात उच्चतम कामगिरी केली, मेधा पाटकर सारख्या अनेक महिलांनी सामाजिकतेचा वसा घेतला तसेच कल्पना चावला सारख्या अनेक महिलांनी विज्ञान तंत्रज्ञान क्षेत्र पादाक्रांत करुन असामान्यत्व सिद्ध केले. अशा अनेक महिलांनी विविध क्षेत्रात आपले नाव कमावले आहे.

**कविता फाले-बोरीकर**
**माहिती व जनसंपर्क, कार्यालय, नागपूर.**

स्त्री शिक्षणाचा वारसा हाती घेतलेल्या महात्मा फुले यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांनी स्वतः शिकून वारसा चालविला. सिंधूताई सपकाळ यांनी अनेक अनाथ मुलांच पालकत्व स्विकारुन अनेक मुलांच्या माई बनल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना शिक्षण घेतांना परिक्षा फी भरण्यासाठी त्यांच्या पत्नी रमाबाई यांनी कष्ट करुन पैसे कमविले, अशी अनेक उदाहरणे पुरुषांच्या यशामागे स्त्रीयांचा वाटा दर्शवितात.

आपल्या इतिहासात ह्यहिरकणीह्न सारखी एक आई होऊन गेली, जी स्वतःच्या बाळाच्या प्रेमापोटी रायगडाचा उभा कडा उतरुन आली. झाशीची राणी होऊन गेली जी बाळ पाठीवर बांधून लढली, त्यावरुन स्त्री एक अगाध शक्तीचे रुप आहे हे समजते.

*तुझ्या प्रयत्नांना मिळू दे*
*यशाची सोनेरी किनार*
*लक्ष लक्ष दिव्यांनी उजळू दे,*
*तुझा संसार*
*कर्तृत्व अन् सामर्थ्याची*
*ओढून घे नवी झालर*
*स्त्री शक्तीचा होऊ दे*
*पुन्हा एकदा जागर*

पण आजही खरचं स्त्री स्वतंत्र झाली आहे का? हा प्रश्न समाजमनाला अंतर्मुख होण्यास भाग पाडतो हेही तितकेच खरे आहे. महिलांवर अबला म्हणून अत्याचार करणारे कधी सुधारतील? आजही समाजात स्त्री असुरक्षित आहे. लैंगिक शोषण, अत्याचार या गोष्टीमुळे स्त्रीयांचे, मुलींचे जीवन धोक्यात येत आहे. आज ही समाजात मुलींना जन्म देतांना विचार केला जातो. मुलींचा तिरस्कार केला जातो. असा अत्याचार करणाऱ्याने हे लक्षात ठेवले पाहिजे की ती महिला कुणाची तरी आई, बहिण किंवा मुलगीचं आहे.

स्त्री-पुरुष समानता ही समाजात आचरणात आणायला हवी. प्रत्येक स्त्री ही समाजात स्वतःची ओळख निर्माण करीत आहे. त्यांचे कार्यक्षेत्र विस्तारले आहे. आपण अशा स्त्रियांना प्रोत्साहन दिले पाहिजे. कुंटुंबातील केवळ निर्णय तिच्यावर थोपविण्याऐवजी निर्णय घेण्यात तिला सुद्धा सामिल करुन घ्यायला हवे. स्त्री सन्मानाची सुरुवात आपल्या घरापासून करायला हवी. तरचं आपला भारत देश सुरक्षित, सक्षम आणि बलवान होईल.

*तोडून सारे बंधने तू झेप घे आकाशी..*
*लाख संकटे येऊ देत घाबरु नको तू त्याशी*
*जरी परंपरांच्या साखळ्यांनी*
*केले असेल बंदिस्त तूला*
*तरी या साखळ्या तोडून*
*घे उंच भरारी आकाशी,*
*ताऱ्याप्रमाणे चमक आणि फुलासारखी बहर*
*दहाही दिशा काबिज कर*
*उडाण भर तुझी उंच उंच या आकाशी*

जागतिक महिला दिन फक्त एका दिवसापुरतं मर्यादित न ठेवता रोजच आपण महिलांना सन्मानपुर्वक वागणूक दिली पाहिजे व यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत. पुरुषांनी स्त्रीयांचा अधिकार मनाने स्विकारलाह्न तिचे महत्त्व ओळखले.. तरच हा जागतिक महिला दिन साजरा केल्याचे सार्थक होईल.

■ ■ ■ ■

# महिला सुरक्षित नाहीतच!

भारत हा पुरुष प्रधान देश असला तरी स्त्री शक्तीचा आदर करणारा देश आहे. आज जगातील प्रत्येक महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून सर्व जबाबदाऱ्या स्विकारणारी एक अनुभूत शक्ती आहे. असे म्हटले तरी अतिशयोक्ती होणार नाही. महिला ही अशी शक्ती, ताकद आणि स्फूर्ती आहे. की कुणाही कमजोर व्यक्तीला सांभाळून घेणारी माता आणि भगिनी आहे. कारण कुटुंबाची सर्वात जास्त काळजी घेणारी व्यक्ती म्हणजे स्त्री होय.

'जेव्हा कधी एखादी स्त्री आजारी पडते ना.. तेव्हा तिचं पहीलं टेन्शन तिचं स्वतःचं आजारपण नसतं तर तिच्या कुटुंबियांच्या जेवणाचं असतं.' अशी काळजी करणारी महिला नसेल तर कुटुंबाची वाताहात होते. कारण आपल्या चिंताग्रस्त पतीला, मुलाला कोणत्याही प्रसंगाच्या वेळी नेहमी खंबीरपणे सांगते मी आहेना तु घाबरु नकोस. या शब्दात एवढी ताकद आहे की कमजोर व्यक्तीला कोणतेही आव्हान उचलण्यासाठी एक प्रकारची स्फूर्ती देणारी ही कुटुंबातील माता किवा भगिनी होय. अनेक घरात वरील वाक्य नेहमीच उच्चारले जाते.

आजच्या डिजिटल युगात महिला सर्वच क्षेत्रात अग्रेसर आहे. याची जाणीव ठेऊन केंद्र सरकारने महिलांना आरक्षण देणारे विधेयक मंजुर करुन तमाम स्त्रीवर्गाला बहुमान दिलेला आहे. या आरक्षणा बरोबर समाजात सन्माननिय वागणूक मिळाली तरी पुरेशे आहे. काळजी घे हा शब्द काळजातून निघतो. आपल्या परक्यांची जाण करुन देतो. कोणीतरी आहे आपल्यासाठी झुंजणारं, कोणीतरी आहे आपल्यासाठी रडणारं या भावनांनी घरातील कर्त्या पुरुषाचा जीव सुखावतो.

काळजी घे या शब्दातच आपलेपणा दरवळतो. आणि हे शब्द असतात ते घरातील माता - बहिणीचे. ज्या वेळी घरातील मुले किवा कर्ता घराबाहेर जातो तेव्हा मायेने बोलणारी ही घरातील कर्ती स्त्री असते. त्यामुळे घरातील कर्त्या व्यक्तीला वेगळी उर्जा मिळते. त्यामुळे ती व्यक्ती सफलते कडे प्रवास करते. ती लहान मुलांना घडवणारी एक अदभूत शक्ती असते.

नम्रता हा गुण सर्व गुणांपेक्षा जास्त किंमती व मौलवान आहे. तो ज्याच्याकडे आहे त्याच्या भोवती कितीही बलाढ्य स्पर्धक असले तरी ती आयुष्यात नक्कीच यशस्वी होतो. कारण 'व्यवहार हा घरातील शुभकलश आहे, इंसानियत घरातील तिजोरी आहे, मधुर वाणी घरातील धन दौलत आहे, शांती घरातील महालक्ष्मी आहे, पैसा हा घरातील क्षणीक पाहूणा आहे, एकता घरातील ममता आहे, व्यवस्था घरातील शोभा आहे आणि समाधान हे घरातील खरे सुख आहे.' हे सर्व टिकवण्यासाठी घरातील स्त्रीला मुक्तता हवी. तसे पाहिले तर हे सर्व गुण घरातील स्त्रीकडे असतातच असतात. त्यांच्यामुळेच आपण सुखी व समाधानी आहोत.

महिलांवर आजही दिवसा ढवळ्या अत्याचार होत आहेत. ते थांबले पाहीजे. त्यासाठी सरकारने सुरक्षितता द्यायला हवी. तरच आजची स्त्री ताठ मानेने कुठेही आणि कधीही फिरु शकेल. आज घरातील स्त्री किंवा मुलगी बाहेर गेली तर ती घरात येई पर्यंत घरातील इतर व्यक्तींच्या जीवात जीव नसतो. म्हणून आरक्षणाबरोबर महिलांना समाजात स्वैर आणि स्वच्छंदी जगण्याचा सुरक्षीत मुलभूत हक्क प्रथम द्यायला हवा. स्त्रीला आरक्षण देवून देवी बनवून बंदिस्त करण्यापेक्षा तिच्या पंखाना बळ देवून तिला मुक्त विहार करु द्या. हीच या जागतिक महिला दिनाची फार मोठी भेट महिलांना दिली पाहिजे.

महिलांना चार वेदांचे अर्थ नाही समजले तरी चालेल पण समजदारी, जबाबदारी, वफादारी आणि इमानदारी या चार शब्दांचे मर्म समजले तरी आपले जीवन सार्थकी लागेल असे सर्व महिला समजतात. जगातील महिलांच्या महिला दिनाच्या निमित्ताने प्रत्येक भारतीयांचेच नव्हे तर प्रत्येक मानवाचे कर्तव्य आहे ते स्त्रीयांचे संरक्षण करण्याचे. कारण आपणच म्हणती की बेटी बचाव - बेटी पढाव.

म्हणून प्रत्येकाने स्त्रीयांच्या कर्तृत्वाला दाद देवून आपण सवार्नी स्त्रीयांचा आदर केला तरच जागतिक महिला दिन साजरा केलाचा आनंद व्यक्त करुन ती उत्साहात साजरा झाल्याचे समाधान मिळेल!



**दत्ताराम दळवी**
**लालबाग, मुंबई.**
**9820527855**

●●●●●●

# वाडी झाली दीडलाखाची!

(कालच्या अंकावरून पुढे)

**उत्तरार्ध**

**अरूण सोपानराव कराळे**
**वाडी, नागपूर.**
**९०९६३२६२७२**

गोदाम मालकांना भाडे अधिक मिळत असल्याने ते काही वर्षांतच गब्बर बनले आहेत. मात्र त्यांच्या गब्बरपणाचा फटका सर्वसामान्यांनी का म्हणून भोगावा असाही प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

एवढेच नव्हे तर गोदामात मोठ्या प्रमाणात कचरा असतो. तो कचरा योग्य ठिकाणी न टाकता सरसकट जाळल्या जातो. यावेळी कित्येकांना श्वसनाचे आजार बळावले आहेत. शिवाय गोदाम रात्री उशिरापर्यंत सुरू राहत असल्याने आसपास राहणाऱ्यांना शांत झोपता येत नाही. यामुळे कित्येकांना रक्तदाबाचा आजारही जडला आहे.

घरातील शांतता भंग झाल्याने बहुतांश मंडळींना मधुमेहानेही कवेत घेतले आहे. एवढेच नव्हे तर गोदामातील मालासोबत चोरांचाही वावर, वाढला आहे. त्या चोरांच्या टोळ्या गोदामातील माल तर लंपास करतात पण सोबत आसपास राहणाऱ्या - सर्वसामान्यांचेही सामान लुटून नेतात. ही सर्व परिस्थिती पाहता आता लोकहितास्तव वाडीतील गोदामे शहराबाहेर न्यावीत, तेव्हाच समस्या संपतील. अन्यथा भविष्यात गोदामनगरी गुन्हेगारीनगर म्हणून उदयास येईल.

आज जवळपास दिड लाख लोकसंख्येच्या वाडीमध्ये सरकारी दवाखाना नसल्यामुळे नागरिकांना आरोग्य सेवेपासून वंचीत राहावे लागत आहे. सध्या स्थानिक व्याहाडपेठ अतंर्गत आरोग्य केंद्र आहे.

आयुध निर्माणी व एम.आय.डी.सी.मधील कामगारांची संख्या आणि उपराजधानी जवळ असल्यामुळे वाडीत लोकसंख्येचा आलेख दरवर्षी वाढत आहे. येथून कोलकाता-धुळे राष्ट्रीय महामार्ग गेलेला असल्याने वाहतूकं मोठ्याप्रमाणात वाढली आहे. नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्गावरील वाडी पोलीस ठाणे ते गुरूद्वारापर्यंतच्या २.३ किलोमीटरच्या उड्डाणपुलाचे भूमिपूजन २ मार्च २०२२ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आमदार समीर मेघे यांच्या उपस्थितीत विधिवत पार पडले.

आणि त्याच उड्डाणपुलाचा लोकार्पण सोहळा रविवार ६ ऑक्टोबर २०२४ रोजी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते पार पडला.

एकुण २४५ कोटी रुपयाचे बहुप्रतिक्षित वाडी उड्डाणपूल रहदारीसाठी १६ सप्टेंबर पासुन खुला केल्यामुळे वाडी उड्डाणपुलामुळे स्मार्ट दिसायला लागली. उड्डाणपूल सुरु झाला तेव्हापासुन अपघाताच्या संख्येत घट झाली आहे. शासकीय रुग्णालय नसणे ही वाडीसाठी शोकांतिका आहे. अपघातग्रस्तांसह अन्य नागरिकांना उपचारासाठी स्थानिक खाजगी किंवा नागपुरातील रुग्णालयांचा आधार घ्यावा लागत आहे.

नगर परिषदेने पुढाकार घेऊन शासकीय रुग्णालय सुरू करावे, अशी येथील नागरिक अपेक्षा व्यक्त करीत आहेत. वाडीत जेव्हा ग्रामपंचायत होती, तेव्हा शासकीय रुग्णालयाचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. त्या प्रस्तावास मान्यताही देण्यात आली होती. आता मान्यता मिळाली म्हणजे रुग्णालय उभे राहणार, असेच सर्वांना वाटत होते. पण आजपर्यंत रुग्णालय उभे झालेले नाही.

तथापि, वाडी गावात फक्त बालसंगोपन केंद्र आहे. येथे केवळ गरोदर मातांची तपासणी करून औषधांचा पुरवठा केला जातो. नागपूर जवळ असल्याने आपातकालीन व्यवस्थाच उभारण्यात आलेली नाही. त्यामुळे क्षुल्लक समस्या असली तरी वाडीवासीयांना नागपूरशिवाय पर्याय नाही. ग्रामपंचायतची नगर परिषद झाली. म्हणजे काय, तर गावाचा दर्जा वाढला. त्यामुळे करात वाढ झाली. पण त्या तुलनेत सोयी-सुविधा का निर्माण करण्यात येत नाही, हा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे.

नगर परिषद प्रशासनाने नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पुढाकार घ्यावा. शेवटी 'हेल्थ इज वेल्थ' हे 'तत्त्व समजून घेतले तर नक्कीच तोडगा निघेल. पण तोडगा कोणते सरकार काढेल, याकडे येथील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

■ ■ ■

# महिलांवरील अत्याचार

दिवसागणिक महिलावरील अत्याचार वाढत आहेत. रोज नव्या नव्या बातम्या पुढे येत आहेत, मन हेलावून सोडणाऱ्या या बातम्यामुळे समाजापुढे मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. पुणे येथील स्वारगेट बसस्थानकावर एका २६ वर्षीय मुलीवर अत्याचार पाठोपाठ केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांच्या मुलीवर सुद्धा सामाजकंटकणी छेडखानी करण्याचा प्रयत्न केला आहे. सुरक्षा रक्षक असतांना सुद्धा असा अत्याचार केला जातो व तेही मुलीवर हा प्रकार समाजमन सुन्न करणारा आहे. जिथे मंत्र्याची मुलगीच सुरक्षित नाही तिथे इतर मुलींची काय स्थिती? याचा विचार करण्याची वेळ आहे.

गुन्हेगार कितीही मोठा असला तरी त्याला कठोरातील कठोर शिक्षा होणे आवश्यक आहे. कायद्याच्या कसोटीतून त्याची सुटका होऊ नये अशी सर्वसामान्य, जनतेची मागणी आहे. आज समाजात गुन्हेगारी मोठ्या प्रमाणात वाढली आहे. खून, दरोडा, चोरी, अत्याचार या नित्याच्या बाबी झाल्या आहेत. रोज कुठे-ना कुठे अशा वाईट घटना घडत आहेत.

गुन्हेगारांवर वचक निर्माण करण्यास शासकीय संस्था अपयशी ठरल्या आहेत. गुन्हेगार हा कोणत्याही पक्षाचा असो,कोणत्याही संघटनेचा असो, त्याला शिक्षा व्हायलास हवी. न्यायालयाचा तावडीतून त्याची सुटका होता कामा नये. पुणे येथील प्रकरण गंभीर आहे. पुणे विद्येचे माहेर घर आहे. येथूनच महात्मा फुले यांनी स्त्री शिक्षणाचा पाया रचला .स्वतः स्त्रियांना शिकविण्याचा निर्धार केला. यासाठी त्यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षित केले त्यामुळे आज स्त्री शिक्षणाची बीजे सर्वत्र रोवल्या गेली.आज अनेक मोठमोठ्या पदावर स्त्रिया विराजमान आहेत.



मात्र सामाजिक विकृतीमुळे त्यांचा मनात असुरक्षेतेची भावना वाढीस लागली आहे. घराबाहेर पडतांना सुद्धा महिलांच्या मनात भीती निर्माण झाली आहे. काही अल्पवयीन मुलीवर अत्याचार तर काही प्रौढ मुलीवर अत्याचार या नित्याचा बाबी झाल्या आहेत. गुन्हेगार मस्तवाल झाले आहेत,कायद्याचा धाक राहिलेला नाही. त्यामुळे गुन्हेगाराची मुजोरी दिवसागणिक वाढत जात आहे.

कायदा कठोर करण्याची वेळ आलेली आहे. अटक झाल्यानंतर परत गुन्हेगार जामिनावर सुटतो, समाजात वावरतो. महिलावरील अत्याचाराचे वाढते प्रमाण बघता अशा गुन्हेगारांना फाशीची शिक्षा हा एकमेव शिक्षेचा मानक असायला हवा. त्यामुळे महिलावरील अत्याचार कमी होण्यास मदत होवू शकेल.

**नितीन कैलासराव गोहने**
**रा. हिरापूर ता. सावली जि. चंद्रपूर**
**8275393387**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडात महिलावरील अत्याचाराचा बाबतीत कठोर शिक्षा होत असायची, स्वतः शिवाजी महाराजांनी महिला सुरक्षिततेवर भर दिला होता. इतिहास उलगडून पाहत असतांना शिवाजी महाराजांचे धोरण महिलांप्रती आदरभावाचे होते. शिवाजी महाराजांच्या कालखंडातील अनेक प्रसंग असे आहेत ज्यात महाराजांनी महिलंचे रक्षण केले होते.

पुण्याजवळील रांझे गावातील घटना महाराजांचे सैनिक बाबाजी गुजर यांनी शेतकऱ्यांच्या मुलीवर अत्याचार केला शिवाजी महाराजांना ही बाब माहित झाली. तेव्हा त्यांनी बाबाजी गुजर यांचे हातपाय तोडले होते. दुसऱ्या एका घटनेत कर्नाटक राज्यातील बेलवडी किल्लावर सकुजी गायकवाड या सैन्याने स्वारी केली आणि किल्ला जिंकला. किल्ला जिंकणाच्या नादात सकुजी गायकवाड या सैन्याने शत्रू असलेल्या सावित्री देसाई या महिलेवर अत्याचार केला. शिवाजी महारांजाना ही बातमी कळ्ली, महाराज फार दुखी झाले. परकीय शत्रू दुश्मन जरी असला तर त्याचा मान सन्मान राखला गेला पाहिजे असा शिवाजी महाराजांचा विचार होता.

क्षणाचाही विलंब न लावता महाराजांनी सकुजी गायकवाड या आपल्या सैनिकांचे डोळे काढले व शिक्षा दिली. होती. शिवाजी महाराजांच्या काळात अशा प्रकाराच्या शिक्षा दिल्या जात होत्या. आजचे सरकार शिवाजी महारांजाच्या विचारधारेवर चालणारे असल्याचे असे सांगितले जात असले तर मग शिवाजी महाराज यांनी जी शिक्षा निती अवलंबली होती. त्या शिक्षा नितीचा अवलंब का केला जात नाही? अशा प्रकारच्या शिक्षा नितीमुळे महिलांच्या अत्याचारावरील घटनावर अंकुश लावता येऊ शकतो.

महिला आज प्रत्येक क्षेत्रात पुढे आहेत. मागील दहा-बारा वर्षातील आपण दहावी आणी बारावीचा निकाल बघितला तर महाराष्ट्रात मूली प्रथम आलेल्या दिसून येतील. अत्यंत प्रामाणिकपणे अभ्यास करून मूलींनी उत्तम यश प्राप्त केलेले आहेत. त्याचबरोबर कुटुंबाचा गाडा सुधा व्यवस्थितपणे चालवीला आहे. नोकरी-शिक्षण, व्यवसाय या निमित्याने बाहेर गावी असलेल्या मुली असुरक्षित आहेत. नराधमांच्या हातून मुक्या, बहिऱ्या, अपंग माता भगिनींही सुटलेल्या नाहीत. स्त्रीकडे शरीर म्हणून बघणारी मानसिकता कधी बदलणार? हा खरा प्रश्न आहे.

हरियाणा राज्यातील महिला काँग्रेस अध्यक्ष हिमानी नरवाड यांची क्रूरपणे बलात्कार करून हत्या करण्यात आली. त्यांचा मृतदेह सूटकेस मध्ये टाकून फेकण्यात आला. मनाला संताप आणणारी ही घटना, अशा घटनावर अंकुश लावण्यासाठी पोलिसांनी दक्ष राहण्याची आवश्यकता आहे. कठोरातील कठोर कायदे निर्माण झाले पाहिजेत.

अशा घटनामध्ये समाविष्ट गुन्हेगारांना फाशीची शिक्षा झाली पाहिजे. त्यासाठी जलद गती न्यायालयामध्ये सुनावणी होवून निर्णय लवकर लागल्यास भविष्य काळात महिलांवरील होणारे अत्याचार थांबविता येतील यात शंका नाही.

■ ■ ■

# कर्मयोगी शिक्षकाचे स्वकथन 'जागरण'

(कालच्या अंकावरून पुढे)

**उत्तरार्ध**

**डी. बी. जगत्पुरिया**
**9860485398**
**मीरानगर, पडेगांव, औरंगाबाद.**

त्यांना काही छुपे शत्रूही निर्माण झाले. त्यांच्यावर खोटे बनावटी बाळंत आले व सातपुते त्यांनी सत्याचा हमरस्ता कधी सोडला नाही. कटू अनुभव पचवण्याची सवय त्यांनी लावून घेतली .

कवी कमलाकर देसले म्हणतात ....
अनुभवावा संघर्षाचा थरार मित्रा
चढणे सरते तेव्हा येतो उतार मित्रा...
शेळी नाही सिंहच आहे कळल्यावरती
कोल्हे, कुत्रे भुकून झाले फरार मित्रा....

सातपुतेनी विरोधकांना लाजवून सोडले. त्यांच्यातल्या व्रतस्थ कर्मयोगी अध्यापक नमला नाही! तो अधिकच जोमाने झुंजत राहिला . स्वच्छता तर सातपुतेना हवीच होती .शाळेच्या खोलीत पटांगणात स्वच्छता ठेवण्याचा उपक्रम यशस्वी केला. स्वतः सफाई करून इतरांना त्याची सवय लावली. सुट्टीविना शाळा हा महाकठीण उपक्रम यशस्वी केला.

'भारत सातपुते है तो मुमकिन है' हे मानायला भाग पाडले .परिपत्रका शिवाय जादा तास घेऊन मुलांचे कल्याण केले. मुलांचे आरोग्य सुदृढ राहण्यासाठी विविध उपक्रम सुरू करून,' सुदृढ शरीरात सुदृढ मन बसते' हा भिंतीवरचा सुविचार प्रत्यक्षात उतरवला .शालेय समितीवर सदस्य म्हणून येणाऱ्यासाठीही ही कठोर नियमाची अंमलबजावणी करून दाखवली. ज्यांची मुले शाळेत त्यांनाच समितीचे सदस्यत्व देण्यात आले.दांडी मारणाऱ्या कर्मचाऱ्यांना वाटणीवर आणले. वशिलेबाज शिक्षकावर बडगा उगारला. प्रसुतीकाळात रजेवर जाणाऱ्या शिक्षिकेच्या वेळेवर पगार मिळायची चोख व्यवस्था केली. असे सर्व चमत्कार घडवण्यासाठी शिक्षकाच्या देहाला भारत सातपुते हे नाव धारण करावे लागते. बाणेदार, कणेदार आणि स्वाभिमानी असावे लागते !

जे मराठवाड्याचे 'कुसुमाग्रज' थोर कवी श्री. दि. इनामदारांना वाटले ते भारत सातपुते नावाच्या जिंदा दिल शिक्षकाने प्रतृयक्षात उतरवले. श्री. दि. म्हणतात...

सोन्यालाही सुगंध लाभे ज्ञानाला चांदणे
माझी शाळा पहा बांधते विद्येला तोरणे

सातपुतेनी अफाट श्रम घेऊन शाळेला गुणवत्तेचे वैभवी तोरण बांधले. अशी आजोड कामांची यादी मोठी आहे. हे स्वकथन जिल्हा परिषदेतील शिक्षण क्षेत्रातील अनागोंदी, राजकारण भ्रष्ट कारभारावर बेधडक भाष्य करते.

भारत नावाच्या या धडपडणाऱ्या मुलाला या भारत देशातील लहान खेड्यात शिकण्यासाठी संघर्ष करावा लागला.

भाकरीची शिकार करण्यासाठी पडतील ती कामे करावी लागली .नोकरीतील संघर्ष करावा लागला. बरं बोलण्यापेक्षा खरं बोलला म्हणून किंमत चुकावी लागली. शिक्षा भोगावी लागली . भारतने कवितेच्या क्षेत्रातही--

कविता ममतेचा पंख
गर्जनेचा शंख
बंडांचा डंख असते....(ठिणगी पृ.३)

हे सिद्ध करून दाखवलं त्याचे हे 'जागरण' व्यवस्था परिवर्तनाचा ध्यास घेतलेल्या कर्मयोगी शिक्षकाचे प्रबोधन पर दस्त-ऐवेज आहे .जन्मदात्याचा आईभऊनी त्यांना जागरणाला जावू दिले नाही. स्वतः जागरण करून त्यांना शिक्षण दिलं म्हणूनच या स्वकथनात भारत सातपुतेनी आईभऊसह संबळ तुणतुण्याला सन्मान बहाल केला आहे. कविश्रेष्ठ श्री. दि. इनामदारांच्या भाषेत सांगायचे तर.....

सूर्य उगवला उठा उठा रे प्रकाश दे हाका
आयुष्याच्या तेजावरती पाय पुढे टाका ...

असा संदेश या स्वकथनातून कर्मयोगी शिक्षकाने दिला आहे. 'जागरण' मधून डंका वाजवणाऱ्या भारत सातपुतेना खूप-खूप शुभेच्छा!

■ ■ ■

**वाचक लिहितात**

## ...तेव्हा प्रत्येक दिवस हा महिला दिनच असेल!

दरवर्षी देशभरात जागतिक महिला दिन उत्साहाने साजरा केला जातो. आपल्या कर्तृत्वाने नावलौकिक मिळवलेल्या स्त्रियांचा या दिवशी विविध कार्यक्रमांतून, वृत्तवाहिन्यांतून, वृत्तपत्रांतून गौरव केला जातो. महिला दिनाच्या निमित्ताने ऑनलाईन विक्रीच्या संकेतस्थळांवरसुद्धा महिलांसाठी विशेष ऑफर ठेवल्या जातात. खासगी कार्यालयांतून महिला अधिकाऱ्यांचा गौरव केला जातो, हे सर्व पाहिल्यावर एक प्रश्न पडतो कि स्त्री ही केवळ एक दिवस गौरवण्याची बाब आहे का?

या भारतभूमीचा, येथील प्राचीन हिंदू संस्कृतीचा अभ्यास केल्यास येथे स्त्रीला नेहमीच सर्वोच्च स्थान दिले गेल्याचे लक्षात येईल. रामायण घडले ते माता सीतेच्या हरणामुळे, महाभारत घडले द्रौपदीच्या अपमानामुळे. स्त्रीचा सन्मान करण्याची आणि तिच्या रक्षणासाठी सर्वस्व पणाला लावण्याची शिकवण येथील संस्कृती आपल्याला देते. जर वीरमाता जिजाऊने शिवाजी महाराजांना बालपणीच शौर्याचे, अन्यायाच्या प्रतिशोधाचे, जनतेचे सर्वस्वी कल्याणाचे बाळकडू पाजले नसते तर कदाचित या देशाला हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवराय लाभले नसते. एव्हढा गौरवशाली इतिहास ज्या भारतभूमीला लाभला आहे त्या भारतात आज स्त्रियांची काय दशा झाली आहे? इथे ६ महिन्याच्या बालिकेपासून ९० वर्षाच्या वृद्धेवर बलात्कार होतात. शिक्षण असो, पोलीस असो किंवा वैद्यकीय क्षेत्र असो कोणतेही क्षेत्र आज महिलांसाठी सुरक्षित राहिलेले नाही. त्यामुळे अशा असुरक्षित समाजात ताठ मानेने जगायचे असेल तर आजच्या स्त्रीपुढे कोण्या मॉडेलचा किंवा नटीचा आदर्श असून चालणार नाही. आजच्या स्त्रीपुढे आदर्श हवा आपल्या पराक्रमाने शत्रूला नामोहरम करणा?या झाशीच्या राणीचा, अहल्याबाई होळकरांचा, वीरमाता जिजाऊंचा, राणी पद्मिनीचा आणि राणी चेन्नम्माचा. जेव्हा प्रत्येक स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सक्षम होईल, तेव्हा कोणाची हिम्मत होणार नाही तिच्याकडे वाकड्या नजरेने पाहण्याची. तेव्हा प्रत्येक दिवस हा महिला दिनच असेल.

■ **ज्योती रावराणे, कांजूरमार्ग, मुंबई .**

## महिला सक्षमीकरण अत्यावश्यक!

प्रतिवर्षी जागतिक महिला दिन देशभर उत्साहात साजरा केला जातो. या दिवशी नेतेमंडळींकडून स्त्री पुरुष समानतेच्या, महिलांच्या सक्षमीकरणाच्या गोष्टी केल्या जातात, महिलांचा आदर करण्याचे सल्ले दिले जातात. महिलांच्या सन्मानार्थ शासकीय कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. या एक दिवशी महिलांना यथोचित सन्मान दिला जात असला तरी अन्य दिवसांतील महिलांविषयक गुन्ह्यांचा आलेख पाहता तो आजवर नेहमीच चढता राहिला आहे. दिवसागणिक समाजाचे होत चाललेले नैतिक अधःपतन ही चिंतेची बाब आहे.

त्यावर आज उपाययोजना काढली नाही, तर भविष्यात स्त्रियांना समाजात वावरणेही कठीण होऊ शकते. त्यासाठी सर्वप्रथम अश्लील संकेतस्थळाच्या प्रसारणावर पूर्णतः बंदी आणणे आवश्यक आहे. वेब सिरीज, चित्रपट आणि जाहिरातींमध्ये अश्लील आणि कामुक दृश्ये दाखवण्यास प्रतिबंध घातला पाहिजे. बलात्कार आणि विनयभंगाच्या गुन्ह्यातील आरोपींना अश्लील मालिकांतून आणि दृश्यपटांतून प्रेरणा मिळत असल्याचे निरीक्षण संबंधित गुन्हेगारांच्या सर्वेक्षणातून एका संस्थेने समोर आणले आहे. त्यामुळे या बाबीकडे सरकारने गांभीर्याने पाहायला हवे. शाळा महाविद्यालयांतून नैतिक मूल्याचे शिक्षण अनिवार्य केले जावे आणि या विषयाच्या वर्गामध्ये थोरा मोठ्यांच्या चरित्रांसोबत रणरागिणी झाशीची राणी, राजमाता जिजाऊ, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांसारख्या शूर आणि कर्तृत्ववान योध्यांची चरित्रे शिकवली गेली पाहिजेत. मुलींना शाळा महाविद्यालयांतून स्व-संरक्षणार्थ ज्युडो कराटेचे, लाठीकाठीचे प्रशिक्षण अनिवार्य केले पाहिजे. इतरांवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या रक्षणाची जबाबदारी प्रत्येक स्त्रीने स्वतःच घेतली पाहिजे. व्यवहारिक जीवनातील नानाविध क्षेत्रे आज स्त्रीने पादाक्रांत केली आहेत, ज्या दिवशी स्त्री स्वतःचे रक्षण करण्यास सिद्ध होईल, ज्या दिवशी स्त्री अत्याचाराचा आलेख घसरू लागेल तेच खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण असेल.

■ **सौ. मोक्षदा घाणेकर, काळाचौकी, मुंबई.**

**अशोकायन**



**प्रा. अशोक सारडा**
**मेहकर**
**(९४२१३९४३३९)**

## जागतिक महिला दिन

घरी दारी स्त्री
कुटूंब हितासाठीच राबते
तरी तिच्या पदरी कां
दुय्यम वागणूक येते ?..


युगानुयुगे महिलांवर होती
घरी - दारी अत्याचार
पुरुष प्रधान संस्कृती कधी
समान न्याय हक्क देणार ?

बेगडी आमची परंपरा
दुटप्पी विचारसरणी
मंदीरात टेकवितो माथा
मातृशक्तिच्या चरणी ...!



# बालांगण

## वाळवंटातील बर्फवृष्टी



आता उन्हाळा सुरू झाल्याने वातावरण तापते आहे. जगातील सर्वात उष्ण आणि कोरड्या ठिकाणांपैकी एक असणारे सहारा वाळवंट तुम्हाला माहिती आहेच. मात्र तिथे हिम वर्षाव झाल्याची एक अद्भुत आणि दुर्मीळ नैसर्गिक घटना तुम्हाला माहिती आहे का? १८ फेब्रुवारी १९७९ रोजी अल्जेरियातील ऐन सेफ्रा शहरात सहारा वाळवंटात ही पहिली बर्फवृष्टी झाली होती. स्वाभाविकच या अनपेक्षित घटनेनंतर शास्त्रज्ञ आणि स्थानिक लोक हादरून गेले होते. या दिवशी तिथे सुमारे ३० मिनिटे बर्फाचे वादळ झाले, तापमान उणे २ अंश सेल्सिअसपर्यंत घसरले. तथापि, बर्फ जास्त काळ टिकला नाही. त्यामुळेच तेव्हा कोणतेही अधिकृत छायाचित्रे काढता आली नाहीत.

**सफर देशांची**

मित्रांनो, सहारा वाळवंटाचे प्रवेशद्वार मानले जाणारे ऐन सेफ्रा शहर समुद्रसपाटीपासून तीन हजार फूट उंचीवर असून ते सर्व बाजूंनी ॲटलास पर्वतांनी वेढलेले आहे. भौगोलिक स्थानामुळे हे ठिकाण अत्यंत उष्णता आणि कोरडेपणासाठी ओळखले जाते. उन्हाळ्यात येथील तापमान ५८ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचते. अशा परिस्थितीत, हिमवर्षावाची घटना निसर्गाचा अद्भुत करिष्मा प्रतिबिंबित करते.

१९७९ नंतर ऐन सेफ्रा येथे पुन्हा अनेक वेळा बर्फवृष्टी झाली. २०१६, २०१७, २०१८, २०२१ आणि २०२२ मध्येही येथे बर्फ पडला होता. २००५ आणि २०१२ मध्ये हलक्या स्वरूपाची हिमवृष्टी झाली होती, परंतु २०१६ मध्ये पहिल्यांदाच या ऐतिहासिक घटनेचे फोटो काढण्यात आले. हे फोटो प्रसिद्ध छायाचित्रकार करीम टाटा यांनी काढले होते. याद्वारे त्यांनी या दुर्मीळ घटनेला अमर केले.

शास्त्रज्ञांच्या मते सहारा वाळवंटातील हिमवर्षावाची घटना हवामान बदलाचे लक्षण असू शकते. सहारा वाळवंट हजारो वर्षांत अनेक वेळा बदलले आहे. शास्त्रज्ञांच्या मते, पुढील १५ हजार वर्षांत हे वाळवंट पुन्हा हिरवेगार होऊ शकते. यामागील कारणे पृथ्वीच्या अक्षातील बदल आणि मान्सून वाऱ्यांच्या दिशेने होणारे बदल असू शकतात.

## वाघ बघायला जायचंय?



एवढा परीक्षांचा काळ संपला की तुम्ही मंडळी भटकंतीसाठी मोकळी होणार आहात. तेव्हा सुट्टीचे नियोजन करताना भारतातील व्याघ्रप्रकल्पांचा नक्की विचार करा कारण वाघाला त्याच्या नैसर्गिक अधिवासात पाहण्याचा अनुभव अत्यंत रोमांचक आणि अनोखा असतो. आपल्या देशात वाघ पाहण्यासाठी काही प्रसिद्ध प्रकल्प आहेत. आज त्यातील काहींची माहिती घेऊ या.

* रणथंभोर राष्ट्रीय उद्यान, राजस्थान:
रणथंभोर राष्ट्रीय उद्यान हे भारतातील सर्वात प्रसिद्ध व्याघ्र प्रकल्पांपैकी एक आहे. हे राजस्थानातील सवाई माधोपूर जिल्ह्यात असून ऐतिहासिक किल्ला आणि घनदाट जंगलांसाठी ओळखले जाते. येथे वाघ दिसण्याची शक्यता जास्त असते कारण येथील वाघ अनेकदा उघड्यावर फिरताना दिसतात. रणथंभोरमध्ये वाघांव्यतिरिक्त बिबटे, हरीण आणि अनेक प्रकारचे पक्षी देखील दिसतात.

**सफर देशांची**

* जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान, उत्तराखंड:
जिम कॉर्बेट राष्ट्रीय उद्यान हे भारतातील सर्वात जुने राष्ट्रीय उद्यान असून ते उत्तराखंडच्या नैनिताल जिल्ह्यात आहे. हे उद्यान वाघ आणि हत्तींसाठी प्रसिद्ध आहे. कॉर्बेटमध्ये वाघ पाहण्यासाठी जीप सफारी आणि हत्ती सफारी उपलब्ध आहे. येथील नैसर्गिक सौंदर्य आणि वन्यजीवांची विविधता तुम्हाला मोहित करेल. कॉर्बेटमध्ये रामगंगा नदीच्या काठावर वाघ पाहण्याचा अनुभव खूप खास आहे.

* बांधवगड राष्ट्रीय उद्यान, मध्य प्रदेश:
बांधवगड राष्ट्रीय उद्यान मध्य प्रदेशातील उमरिया जिल्ह्यात आहे. हे स्थळ वाघ पाहण्याच्या सर्वोत्तम ठिकाणांपैकी एक मानले जाते. येथे वाघांची संख्या बरीच दाट असल्यामुळे ते दिसण्याची शक्यताही जास्त आहे. बांधवगडचा इतिहासही खूप मनोरंजक आहे, कारण प्राचीन काळी ते रेवा राज्याचे शिकारस्थान होते. येथील घनदाट जंगले आणि टेकड्या वाघांना पाहण्यासाठी एक उत्तम वातावरण निर्माण करतात.

## पॅसिफिक महासागरातला सॅमोआ




सॅमोआ हा पॅसिफिक महासागरातला एक देश आहे. १९६२ मध्ये हा भाग न्यूझीलंडपासून वेगळा झाला आणि स्वतंत्र देश म्हणून उदयाला आला. उपुलू आणि सावाई ही इथली प्रमुख बेटं असून नऊ बेटांनी हा भूभाग बनला आहे. 'इंडिपेंडंट स्टेट ऑफ सॅमोआ' हे या देशाचं अधिकृत नाव. पण तो सॅमोआ म्हणूनच ओळखला जातो. हवाई बेटं आणि न्यूझीलंड यांच्या मध्यभागी हा देश आहे. सॅमोअन आणि इंग्रजी या इथल्या अधिकृत भाषा. सॅमोआतल्या नऊ बेटांवर ज्वालामुखी आहेत. या देशाचा जास्तीत जास्त भूभाग सावाई आणि उपुलू बेटांवर आहे. ॲपिया ही या देशाची राजधानी आणि सॅमोआतलं एकमेव शहर.

**सफर देशांची**

पॅसिफिक महासागरातल्या रिंग्ज ऑफ फायर भागात हा देश आहे. या भागात भूकंप आणि ज्वालामुखीच्या उद्रेकाचं प्रमाण बरंच जास्त आहे. माउंट सिसिली हे सॅमोआतलं सर्वात उंच शिखर. सावाई हे सॅमोआतलं सर्वात मोठं बेट असून इथे ज्वालामुखीच्या उद्रेकाचं प्रमाण बरंच जास्त आहे. लालोमानू हा इथला प्रसिद्ध समुद्रकिनारा आहे. इथली पांढरी वाळू पर्यटकांचं लक्ष वेधून घेते. सावाई बेटांवरचा आफू आवू धबधबाही खूप सुंदर आहे. या देशात फिरण्यासारखी बरीच ठिकाणं आहेत. हा देश कृषी उत्पादनांची निर्यात करतो. शेती हा इथला प्रमुख व्यवसाय आहे. त्यामुळे इथली बरीच मोठी लोकसंख्या शेती करते. नारळ, केळी, कोको, कॉफी ही इथली प्रमुख पीकं आहेत. टाला हे इथलं चलन आहे. सॅमोआतले लोक खूप आनंदी आहेत.

## औषधांच्या रंगांमागील रहस्य

मुलांनो, कोणतेही औषध घेता तेव्हा ते वेगवेगळ्या रंगात असल्याचे तुमच्या लक्षात आले असेल. औषधाच्या गोळ्या वा कॅप्सूलला लाल, निळा, हिरवा, पिवळा असे विविध रंग असतात. पण ते फक्त दिखाव्यासाठी आहेत की त्यामागे काही वैज्ञानिक कारण आहे, हे जाणून घ्यायला हवे.

* एखादा रुग्ण एकाच वेळी अनेक औषधे घेतो तेव्हा वेगवेगळ्या रंगांच्या गोळ्या त्याला औषध ओळखण्यास मदत करतात. हे विशेषतः वृद्धांसाठी आणि कमी दृष्टी असलेल्यांसाठी उपयुक्त आहे.

* मेडिकल स्टोअरमध्ये काम करणारे डॉक्टर आणि फार्मासिस्ट देखील औषधांची लवकर ओळख पटवण्यासाठी त्यांच्या रंगांवर अवलंबून असतात. यामुळे चुकीची शक्यता कमी होते आणि योग्य औषध रुग्णापर्यंत पोहोचते.

* बऱ्याचदा कंपन्या औषधांचा रंग अशा प्रकारे निवडतात की त्याचा रुग्णाच्या मनावरही सकारात्मक परिणाम होतो. जसे की, निळ्या आणि हिरव्या गोळ्या सामान्यतः वेदनाशामक, चिंता कमी करणाऱ्या म्हणून वापरल्या जातात कारण हे रंग मनाला शांत करतात. दुसरीकडे लाल आणि नारिंगी गोळ्या ऊर्जा वाढवणाऱ्या किंवा जलद कृती करणाऱ्या औषधासाठी वापरल्या जातात. काळ्या आणि गडद तपकिरी गोळ्यांमध्ये लोह आणि जीवनसत्वाशी संबंधित औषधे असतात जी शरीरात पोषण वाढवण्याचे काम करतात.

**सफर देशांची**

* काही औषधे सूर्यप्रकाशात लवकर खराब होतात. म्हणूनच कंपन्या अशा औषधाचे सूर्यप्रकाशापासून संरक्षण करण्यास मदत करणारे रंग निवडतात. गडद रंगाचा लेप औषधाची गुणवत्ता जास्त काळ टिकवून ठेवतो.



* काही औषधे खूप कडू असतात आणि रुग्णांना त्यांची चव अजिबात आवडत नाही. अशावेळी रंगीत लेप औषधाला आकर्षक बनवतेच त्याचबरोबर त्याची कडू चव देखील लपवते. ज्यामुळे रुग्णांना गोळी गिळणे सोपे होते.

* तुम्हा मुलांना औषध देणे हे एक कठीण काम असते. म्हणूनच कंपन्या चॉकलेट, स्ट्रॉबेरी आणि संत्र्याच्या चवीचे सिरप आणि रंगीबेरंगी चघळण्याच्या गोळ्या बनवतात जेणेकरून तुम्ही आनंदाने औषध घेता.

### ठिपके जुळवा



## गिर्यारोहणाच्या जगात



मुलांनो, गिर्यारोहण म्हणजे माउंटेनिअरिंग. उंचच उंच डोंगर चढायला खूप मजा येते. माउंट एव्हरेस्टसारखं उंच शिखर अनेकजण सर करतात. याबद्दलच्या बातम्या वाचून आपण थक्क होतो. आपणही गिर्यारोहणाचा अनुभव घ्यावा, असं वाटून जातं. गिर्यारोहण वाटतं तितकं सोपं नाही. पण तुमच्या अंगात धाडस असेल तर या क्षेत्रात करीअरही करता येईल. माउंटेनिअरिंगमधल्या करीअरचं हे मार्गदर्शन...

**कोण होणार?**

माउंटेनिअरिंगसंबंधी काही अभ्यासक्रम असतात. बीएमसी म्हणजे बेसिक माउंटेनिअरिंग कोर्स. यात गिर्यारोहणाचे प्राथमिक धडे दिले जातात. दगडधोंडे, बर्फावर कसं चढायचं हे यात शिकवलं जातं. एएमसी म्हणजे ॲडव्हान्स माउंटेनिअरिंग कोर्स. यात गिर्यारोहणाच्या आधुनिक तंत्रज्ञानाबाबत शिकवलं जातं. एमओआय म्हणजे मेथड ऑफ इन्स्ट्रक्शन हा अभ्यासक्रम माउंटेनिअरिंग आणि त्याच्याशी संबंधित इतर क्रीडाप्रकारांचं प्रशिक्षण देण्यासाठी तुम्हाला तयार करतो. एसएआर म्हणजे सर्च अँड रेस्क्यू हा अभ्यासक्रम तुम्हाला गिर्यारोहणादरम्यान काही आपत्कालीन परिस्थिती उद्भवली तर त्यातून कसं बाहेर पडायचं याचे धडे देतो. हे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर क्लाइंबिंग गाइड, लायजन ऑफिसर, पोर्टर, ट्रेक लीडर, ट्रेक ऑर्गनायझर, स्पॉन्सर्ड माउंटेनिअर म्हणून काम करता येईल. केंद्र तसंच राज्यांच्या रेस्क्यू टिममध्ये सहभागी होता येईल.

## हवा शुद्ध करणारी रोपटी



सध्या प्रदूषणाचा प्रश्न गंभीर बनत चालला आहे. वायू प्रदूषणाचे धोके आपण जाणतोच. प्रदूषण कमी करण्यासाठी बरेच प्रयत्न होताना दिसतात. हवेच्या खालावलेल्या पातळीमुळे श्वसनाचे विकार जडू शकतात. हवा शुद्ध करण्यासाठी काहीजण घरात हवा शुद्धीकरण यंत्र म्हणजेच एअर प्युरिफायर बसवून घेतात. पण काही रोपटी हवा शुद्ध करण्याचं काम करतात. तुम्हीही घरात अशी काही रोपटी लावू शकता.

**महत्त्वाचं काही**

* तुळस ही एक औषधी वनस्पती आहे. यासोबतच तुळस वातावरण प्रदूषित करणारे वायू शोषून घेऊ शकते. तुळशीच्या वासामुळे आपल्याला प्रसन्न वाटतं.

* अनेक घरांमध्ये मनी प्लांट लावलं जातं. हे रोपटं भरभर वाढतं. समृद्धीचं प्रतीक म्हणून ते लावलं जातं. पण हे रोपटं हवाही शुद्ध करतं.

* आलं हवेतले कार्बन डाय ऑक्साइडसारखे घातक वायू आणि रसायनं शोषून घेतं. यासोबतच आल्यात घातक जीवाणू आणि विषाणूंचा नाश करण्याचे गुणधर्मही असतात.

* पीस लीली हे रोपटं हवा शुद्ध करण्यासोबतच घराचं सौंदर्यही वाढवतं. या रोपट्याच्या वाढीसाठी सूर्यप्रकाशाची गरज नसते. तसंच याला पाणीही खूप कमी लागतं.

मग मुलांनो, तुम्ही कोणतं रोपटं लावणार?

## का चमकतात डोळे?

छोट्यांनो, अंधारात एखादं मांजर डोळ्यांसमोरून गेलं तर त्याचे चमकलेले डोळे आपलं लक्ष वेधून घेतात. प्राण्यांचे डोळे का चमकत असावेत, असा प्रश्न आपल्याला पडतो. प्राण्यांच्या डोळ्यांवर टॅपेटम ल्युसिडम नावाचा एक थर असतो. या थरामुळे प्राण्यांच्या डोळ्यांवर पडणारा प्रकाश परावर्तित होतो आणि त्यांचे डोळे चमकतात. यामुळे रहदारीच्या रस्त्यावर प्राण्यांना वाहनांची धडक बसत नाही.



अंधारात समोरचं दिसत नाही. पण डोळे चमकल्याने प्राण्यांच्या अस्तित्त्वाची जाणीव होऊन आपण वाहन जपून चालवतो.

**जाणून घ्या**

* आणखी एक गमतीशीर बाब, पृथ्वीवरील वातावरणाविषयी...

पृथ्वीवरचं वातावरण बदलत असतं. उन्हाळ्यानंतर पावसाळा, मग हिवाळा असं ऋतूचक्र बदलत रहातं. हे ऋतू बदलण्यामागचं कारण काय असावं? आपली पृथ्वी सूर्याभोवती फिरते हे आपण जाणतो. पण अ पृथ्वी आपल्या अक्षांमध्ये २३ अंशांमध्ये झुकलेली असल्याकारणाने सूर्याभोवती फिरत असताना तिच्या काही भागांवर सूर्याची किरणं थेट पडतात तर काही भागांवर ती तिरकी पडतात. थेट सूर्यकिरणं पडलेल्या भागात उन्हाळा असतो तर तिरकी किरणं पडलेल्या भागात थंडी म्हणजे हिवाळा असतो.

### चित्र रंगवा



## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

ओळखा पाहू

१) अल्फा केराटिन हे प्रथिन कोणत्या घटकात आढळतं?

२) सचिन तेंडूलकरने १०० वं आंतरराष्ट्रीय शतक कोणत्या संघाविरूद्ध केलं?

३) माय म्युझिक, माय लाईफ हे आत्मचरित्र कोणी लिहिलं आहे?

४) मधुबनी ही कोणत्या राज्यातली चित्रकला आहे?

५) कोणता प्राणी श्वासोच्छवासासाठी त्वचेचा वापर करतो?

६) गोबर गॅसमधला प्रमुख वायू कोणता?

७)नारिंगी क्रांती कोणत्या देशात झाली?

८) जैनांचे चोवीसावे तीर्थंकर कोण?

९) बंगालच्या उपसागरात भारताची किती बेटं वसली आहेत?

१०) दक्षिण भारताचं मँचेस्टर असं कोणत्या शहराला म्हणतात?

उत्तरः १) लोकर २) बांगलादेश ३) पंडित रवीशंकर ४) बिहार ५) बेडूक ६) मिथेन ७) युक्रेन ८) वर्धमान महावीर ९) २०४ १०) कोईबतूर

**महत्त्वाचं काही**

### नखे चावू नका



मित्रांनो, तुमच्यापैकी कोणाला नखे चावण्याची सवय आहे का? असेल तर लगेचच ती सोडा, कारण याचे दात आणि हिरड्यांवर बरेच दुष्परिणाम होतात. उदाहरणार्थ, नखे चावल्याने तुमच्या दातांच्या संरचनेला हानी पोहोचवू शकते. म्हणजेच या सवयीमुळे वाकडे दात किंवा सुजलेल्या हिरड्या यासारख्या समस्या उद्भवू शकतात. त्याचबरोबर दातांच्या अन्य समस्याही उद्भवू शकतात. त्रासदायक बाब म्हणजे नखे चावल्याने बॅक्टेरिया तोंडात जाऊ शकतात. घातक जीवाणू शरीरात प्रवेश करून विविध प्रकारचे संसर्ग देऊ शकतात. यामुळे घशाचे संक्रमण, तोंडाचे आजार किंवा पोटाच्या समस्या उद्भवू शकतात. म्हणूनच कधीही नखे चावू नका.

**महत्त्वाचं काही**

### उन्हाळी त्रासापासून दूर राहा



उन्हाळ्याचे दिवस बरेच त्रासदायक असतात. त्यामुळे या ऋतूमध्ये तुम्हा मुलांनी आरोग्याची विशेष काळजी घ्यायला हवी. उन्हाळ्यात शरीराला घाम येण्याने त्रस्त होण्याचे वा ऊन लागल्याने आजारी पडण्याचे प्रमाण वाढते. म्हणून वाढत्या उष्णतेपासून वाचण्यासाठी पुरेसे पाणी प्या. उन्हाळ्यात शरीरात पाण्याची कमतरता घातक ठरू शकते. या काळात थंड पदार्थ खाऊन शरीर थंडावा राखा. घरातून बाहेर जाताना न विसरता टोपी, गॉगल्स आणि सनस्क्रीन लावूनच बाहेर पडावे. यामुळे सूर्याच्या कडक किरणांपासून बचाव होतो.

**महत्त्वाचं काही**

### परीक्षेच्या तयारीला लागा



मित्रांनो, आता परीक्षांचा काळ जवळ आला आहे. मोठ्या वर्गाच्या परीक्षा सुरुही झाल्या आहेत. या काळासाठी तुम्हीही सज्ज व्हा. हा काळ मानसिक ताण न घेता पार करायचा असेल तर प्रथम अभ्यासाचं वेळापत्रक तयार करा. प्रत्येक विषयासाठी निश्चित वेळ ठरवा आणि रोज तो पाळा. शाळेतील नोट्स आणि पाठ्यपुस्तकांवरच लक्ष ठेवा. महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी जास्त वेळ राखून ठेवा. त्यात अभ्यासातील सर्व विषय समाविष्ट असावेत. त्यासाठी छोटे छोटे अभ्यास सेशन्स ठरवा. म्हणजे एकाच वेळी खूप शिकण्याचा ताण येणार नाही.

**महत्त्वाचं काही**

### सायबेरियन क्रेन



सायबेरियन क्रेन हा स्थलांतर करणारा पक्षी आहे. सायबेरियात प्रचंड थंडी पडल्यावर हे पक्षी भारतात येतात. सायबेरियन क्रेनची गणना दुर्मीळ प्रजातींच्या पक्ष्यांमध्ये होते. त्यांची संख्या झपाट्याने कमी होत आहे. हे पक्षी नष्ट होतील की काय अशी भीती व्यक्त होत आहे. त्यामुळे त्यांच्या संरक्षणाचे उपाय केले जात आहेत.

# पथ्रोट-भुलेश्वरी-गोंडवाघोली रस्त्याची प्रचंड दुर्दशा

## सर्वत्र खड्डयांचे साम्राज्य, नागरिकांना मनस्ताप





**महासागर प्रतिनिधी**

**परतवाडा,( दि.7 )** - पथ्रोट -भुलेश्वरी-गोंडवाघोली या महत्वपूर्ण वर्दळीच्या रस्त्याची प्रचंड दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर खड्डयांचे साम्राज्य पसरले असून वाहन चालवताना वाहन चालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. परिसरातील शेतकऱ्यांच्या शेतमालाच्या वाहतुकीसाठी हा रस्ता अत्यंत महत्त्वाचा आहे. पण रस्त्याच्या दुर्दशेमुळे शेतकऱ्यांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्त्याच्या दुरुस्तीसाठी अचलपूर सार्वजनिक बांधकाम विभागाला परिसरातील नागरिकांनी सातत्याने मागणी केली आहे. परंतु या विभागाने त्याकडे दुर्लक्ष करण्याचे धोरणच अवलंबिले आहे. या खड्डेमय रस्त्यातून वाट काढताना वाहन चालकांची तारांबळ उडते. त्यातूनच या मार्गावर लहान-मोठ्या अपघातांना आमंत्रण मिळत आहे. गेल्या काही दिवसांमध्ये या मार्गावर अनेक अपघात घडले आहेत. भुलेश्वरी येथील शिवमंदिर ऐतिहासिक असून येथील शिवलिंग पांडवांनी स्थापन केल्याची आख्यायिका आहे. महाशिवरात्रीला येथे मोठी यात्रा भरते. भाविकांची या मंदिरात सतत गर्दी असते. परंतु या मंदिराला जोडणारा रस्ता पूर्णत: उखडला असल्याने, भाविकांनाही हाल सहन करावे लागत आहे. वाल्मीकपूर ते कासमपूर हा रस्ता मागच्या वर्षीच निर्माण करण्यात आला होता. पण एका वर्षातच त्याची सुद्धा दुर्दशा झाली आहे. तसेच कासमपूर ते कुणबीवाघोली या रस्त्याचेही वर्षभरापूर्वीच 1 कोटी 20 लक्ष रुपये खर्च करून निर्माण करण्यात आले होते. या रस्त्यावर सुद्धा ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत. संतोष पोहकार नामक कंत्राटदाराने या रस्त्याचे निर्माण कार्य केले होते. या कामात प्रचंड भ्रष्टाचार झाल्याचा आरोप ग्रामस्थांकडून केला जात आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाने पथ्रोट, भुलेश्वरी, गोंडवाघोली, वाघडोह गावाला जोडणाऱ्या रस्त्यांचे तत्काळ नूतनीकरण करून या गावातील रहिवाशांना व वाहन चालकांना दिलासा द्यावा अशी मागणी करण्यात येत आहे.

# दुचाकी चोरीत दोघांना अटक

## दोन गुन्ह्यांची कबुली | राजापेठ पोलिसांची कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** - राजापेठ पोलिसांनी दोन दुचाकी चोरांना 7 मार्च रोजी शहरातूनच अटक केली. चेतन नरेन्द्र चव्हाण (23, रा. सोनोरा, भिलटेक, ता. चांदूर रेल्वे, जि. अमरावती) व त्याचा साथीदार आशिष दिंगाबर पाटील (27, रा. कल्याण नगर अमरावती) अशी आरोपींची नावे आहेत. त्यांनी दुचाकी चोरीच्या दोन गुन्ह्यांची कबुली दिली आहे.

पोलिस सुत्रानुसार, रोहीत चंदीराम बसंतवाणी (34, रा. शंकर नगर, अमरावती) यांची ॲक्टिवा मोपेड क्रमांक एमएच 27 डीडी 4317 ही राहत्या घराच्या पार्किंगमधून चोरी गेली होती. या घटनेच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुध्द गुन्हा नोंदवून तपास सुरु केला होता. सदर गुन्हाच्या तपासात गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी आरोपी चेतन चव्हाण व आशिष पाटील यांना अटक केली, पोलिसांनी त्यांची चौकशी करून, सदर गुन्ह्यात चोरी गेलेली दुचाकी जप्त केली तसेच आरोपींकडुन इतर गुन्ह्यातील एमएच 27 डब्लु 8426 या क्रमांकाची दुचाकी जप्त केली. त्याचप्रमाणे पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून चांदूर रेल्वे पोलिस ठाण्याच्या हद्दीतून चोरी गेलेला एक रिअल मी कंपनीचा मोबाईल जप्त केला. असा एकुण पोलिसांनी 72 हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदरची कार्यवाही पोलिस आयुक्त नविनचंद्र रेड्डी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे, सहायक पोलिस आयुक्त जयदत्त भवर यांच्या मार्गदर्शनाखाली राजापेठचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात पोलिस उपनिरीक्षक मिलीद हिवरे, सागर सरदार, पवन तिवारी, दिनेश भिसे, संजय कडु, पंकज गाठे, सुरज मेश्राम यांनी केली आहे. तसेच सायबर येथील निखील माहुरे, अनिकेत वानखडे यांनी सुध्दा मदत केली आहे.

# गणिताच्या पेपर फुटीचे कनेक्शन तालुक्या बाहेर?

## पोलिसांनी दिली तपासाला गती

## गटशिक्षणाधिकारी वकार अहमद खान यांची माहिती

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** - दहावीच्या पेपर फुटीप्रकरणाचे कनेक्शन हे तालुक्याबाहेरचे असल्याची माहिती पुढे आली आहे. या माहितीला गटशिक्षणाधिकारी वकार अहमद खान यांनी दुजोरा दिली आहे. यासोबतच चांदुरबाजार पोलिसांनी पेपर फुटीप्रकरणाच्या तपासाला गती दिली आहे.

5 मार्चला चांदूरबाजार शहरातील जिजामाता परिक्षा केंद्राजवळील झेरॉक्स सेंटरवरुन गणिताचा दहावीचा पेपर फुटल्याची घटना पुढे आली. याप्रकरणात चांदुरबाजार पोलिसांनी शहेजाद खान शमशेर खान (50, रा. धर्मलपूरा) याच्याविरुध्द गुन्हा नोंदविला. याप्रकरणात गटशिक्षणाधिकारी यांनी पोलिस व केंद्र प्रमुखांचे अहवाल मागितले आहे. सदर अहवाल प्राप्त झाल्यानंतर आवश्यक ती चौकशी करून, पंचायत समिती शिक्षण विभाग आपली कार्यवाही करेल, तसा अहवाल परिक्षा मंडळाला पाठवेल. आमच्या प्राथमिक चौकशीत सदर पेपर फुटीचे प्रकरण, आमच्या परिक्षा कस्टडी क्रमांक 24 अंतर्गत कुठेच घडले नाही. सदर गणिताचा पेपर व्हाट्सअपव्दारे बाहेरून कोठून तरी आला आहे. त्यामुळे गणिताच्या पेपर फुटीचे कनेक्शन तालुक्यात बाहेरील आहे. असा आमचा प्राथमिक अंदाज आहे. यासाठी पोलिसांनी पेपर फुटीचा तपास सायबर सेलव्दारे ही करावा. त्यामुळे सत्य काय ते समोर येईल. असे स्पष्ट मत पेपर फुटीचे बाबतीत स्थानिक गट शिक्षणाधिकारी वकार अहमद खान यांनी व्यक्त केले. यावेळी त्यांनी पेपर फुटीचे कनेक्शन नागपूर असल्याचीही शंका व्यक्त केली. याप्रकरणात चांदुरबाजार पोलीस प्रशासन ही कसून तपास करीत आहे. झेरॉक्स सेंटर वर सापडलेल्या प्रश्नांची उत्तरे,

पेपरमधील प्रश्नाचीच आहेत काय? याबाबत पोलिसांनी जिजामाता शाळेच्या केंद्र प्रमुखांना अहवाल मागितला. त्याच ही उत्तरे गणिताच्या त्याच पेपरमधील प्रश्नांची उत्तरे असल्याचा अहवाल संबंधित केंद्र प्रमुखांनी दिला. त्यावरून पोलिसांनी गुन्हा दाखल केला. पुढील तपास ठाणेदार टाले यांचे मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार गणेश आगोले व दिनेश राठोड करीत आहे.



## विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ

**अमरावती** - माहेरवरून 1 लाख रुपये आणण्याचा तगादा लावून एका विवाहितेचा शारिरिक व मानसिक छळ करण्यात आला. पिडित महिलेने या घटनेची तक्रार 6 मार्च रोजी मोर्शी पोलिसात दिली. त्यानुसार पोलिसांनी आरोपी अभिलाश प्रभाकर वानखडे (30), प्रभाकर वानखडे, एक महिला (तिन्ही रा. लोणी) व एका अन्य महिलेविरुध्द गुन्हा नोंदविला आहे.

# 9 मार्चला जहागीरपुर येथे मंदिर न्यास अधिवेशन




**महासागर प्रतिनिधी**

**कुऱ्हा,( दि.7 )**- अमरावती जिल्ह्यातील पुरातन श्री महारुद्र मारुती संस्थान, जहागीरपुर येथे महाराष्ट्र मंदिर न्यास अधिवेशन रविवार 9 मार्च रोजी सकाळी साडेनऊ ते साडेपाच या कालावधीत आयोजित करण्यात आले आहे. राज्यातील मंदिर व्यवस्थापनांसमोर निर्माण झालेल्या समस्यांवर या अधिवेशनात चर्चा करण्यात येणार आहे. राज्यभरातून मोठ्या संख्येने प्रतिनिधी अधिवेशनात सहभागी होणार आहेत.

महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराज, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी मंदिरांचे संरक्षण केले. परकीय आक्रमकांनी उध्वस्त केलेल्या मंदिराचा जिर्णोद्धार त्यांनी केला. मात्र देशात सेक्युलरवादी राज्यव्यवस्था स्थापन झाल्यानंतर, मंदिरांवर मोठ्या प्रमाणावर आघात करण्यात आले आहेत. मंदिरांचे सरकारीकरण करून तेथील पैशांमध्ये मोठा भ्रष्टाचार केला जात आहे. मंदिरांच्या जमिनीवर गैर मार्गाने कब्जा केला गेला आहे. मंदिरांच्या संरक्षणासाठी त्यामुळेच महाराष्ट्र मंदिर महासंघ कार्यरत आहे. मंदिरासमोर निर्माण झालेल्या समस्या व अडचणी तसेच अन्य बाबींसंदर्भात चर्चा करण्यासाठी जहागीरपुर येथे या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. अधिवेशनामध्ये मठ, मंदिरांचे विश्वस्त, पुजारी, प्रतिनिधी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. अधिवेशनाला उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक श्री. महारुद्र मारुती संस्थान जहागीरपुर, श्री नागेश्वर महादेव मंदिर, धामंत्री, पिंगळादेवी संस्थान, नेरपिंगळाई, महाराष्ट्र मंदिर महासंघ, देवस्थान सेवा समिती, विदर्भ हिंदू जनजागृती समिती यांनी केले आहे.

# नांदगावमध्ये वृध्दाची आत्महत्या



**महासागर प्रतिनिधी**

**वरुड, ( दि. 7 )**- येथुन जवळच असलेल्या नांदगाव येथील रामदास तुळशिराम मसाने नामक 75 वर्षीय शेतकऱ्याने सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून विषारी औषध प्राशन करुन आत्महत्या केल्याची घटना नुकतीच घडली. एकीकडे निसर्ग शेतकऱ्यांना साथ देत नसल्याचे दिसत असतांना शासनाकडून सुध्दा पाहिजे त्या प्रमाणात शेतकऱ्यांना साथ मिळत नसल्याने विदर्भात शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे सत्र सुरुच असून नांदगाव येथे रामदास तुळशिराम मसाने नामक 75 वर्षीय शेतकऱ्याने घरी कोणी नसल्याची संधी साधत विषारी औषध प्राशन केले होते. मृतक शेतकरी रामदास यांचेकडे सोसायटीसह इतरही खाजगी कर्ज असल्याचे कळते. मृत्यूच्या दिवसांपुर्वीच सोसायटीचे पथक वसुलीसाठी येवुन गेल्याचे कुटूंबियांनी सांगितले आणि त्याच विवंचनेतून रामदास यांनी आत्महत्यचे पाऊल उचलल्याची त्यांनी सांगितले. रामदास यांचेकडे केवळ 1 एकर शेती होती आणि त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर कुटूंबाचा उदरनिर्वाह सुरु असतांना अचानक आर्थीक विवंचना निर्माण झाल्याने ही आत्महत्या झाली असावी, असे बोलल्या जात आहे. मृतक रामदास यांचे मागे 1 मुलगा, 3 मुली असा आप्तपरिवार आहे. या प्रकरणी बेनोडा (शहीद) पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून पुढील तपास सुरु आहे.

# घाटलाडकी शेतशिवारात बिबट्याची दहशत

## पिठोडा जंगलात केली गाईची शिकार

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार, ( दि. 7 )** - घाटलाडकी शेतशिवारात गेल्या 15 दिवसांपासून बिबट्याचा वावर वाढला असून, शेतकऱ्यांनी याबाबत वारंवार वन विभागाकडे तक्रारी केल्या. मात्र, वन अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष करण्यात येत आहे. अखेर पिठोडा जंगलातील अनिल इंगोले यांच्या शेतात बिबट्याने गाईची शिकार केली, तरीही वन विभागाने कोणतीही ठोस कारवाई केली नाही. या घटनेमुळे परिसरातील शेतकरी भयभीत झाले आहेत. ओलीताचे प्रमाण मोठे असल्याने शेतकऱ्यांना रात्री अपरात्री शेतात जावे लागते, मात्र 6 मार्च 2025 रोजी झालेल्या गाईच्या शिकारीनंतर शेतकरी अधिकच चिंतेत पडले आहेत.

# तरुणीची आत्महत्या, गुन्हा दाखल

**अमरावती** - एका तरुणाने गळफास लावून आत्महत्या केल्याप्रकरणात दर्यापूर पोलिसांनी 6 मार्च रोजी एका तरुणाविरुध्द आत्महत्येस प्रवृत्त केल्याच्या कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे. निखील रमेश वाडी (23, रा. मलीयेपुरा, दर्यापूर) असे आरोपीचे नाव आहे. आरोपीने तरुणीच्या घरी इलेक्ट्रीकलचे काम केले होते. त्यानंतर तो तिला त्रास देऊ लागला. त्याच्या त्रासापाई अखेर तरुणीने आत्महत्या केली. या घटनेनंतर तरुणीच्या कुटुंबीयांनी दर्यापूर पोलिसात तक्रार दिली.

# महिला दिनानिमित्त आज वॉकथॉनचे आयोजन

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती,( दि.7 )** - आंतरराष्ट्रीय महिला दिनानिमित्त जिल्हा प्रशासनातर्फे शनिवार, 8 मार्च रोजी विभागीय क्रीडा संकुलात सकाळी 6.30 वाजता 'वॉकथॉन 2025'चे आयोजन करण्यात आले आहे. महिला सुरक्षा आणि स्त्री-पुरुष समानता या विषयांवर जनजागृती करण्यासाठी या वॉकथॉनचे आयोजन करण्यात आले आहे.

वॉकथॉनचा मार्ग हा विभागीय क्रीडा संकुलापासून सुरू होऊन इर्विन चौक, मदर टेरेसा मार्ग, गर्ल्स हायस्कूल चौक, शिवाजीनगरमार्गे परत विभागीय क्रीडा संकुल स्टेडियम असा राहणार आहे. या उपक्रमात जिल्हा प्रशासनातील अधिकारी आणि कर्मचारी, विविध संघटना, संस्था, क्लब, शहरातील नागरिक आणि बचतगट सहभागी होणार आहेत. नागरिकांना उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# शिवद्रोही प्रशांत कोरटकरला महाराष्ट्रातून हद्दपार करा

## शिवसेना उबाठा पक्षाची मागणी



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर,( दि.7 )** - जिजाऊ मॉसाहेब, छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्या संदर्भात अभद्र टिप्पणी करून त्यांचा अवमान करणाऱ्या आणि कोल्हापूरचे इतिहास संशोधक इंद्रजीत सावंत यांना धमकी देणाऱ्या शिवद्रोही प्रशांत कोरटकरला गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल करून महाराष्ट्रातूनच हद्दपार करा, अशी मागणी शिवसेना उबाठा पक्षाने केली आहे. यासंदर्भात उबाठाच्या युवा सेनेतर्फे दर्यापूर येथील उपविभागीय पोलीस अधिकारी शिवम विसापूर यांना निवेदन सादर करण्यात आले. युवासेनेचे जिल्हाप्रमुख अंकुश पाटील कावडकर यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांनी हे निवेदन दिले.

महाराष्ट्रात राहून महाराष्ट्राच्याच दैवताबाबत अवमानकारक वक्तव्य करणे, हा राजद्रोह आहे. अशा नाठाळ लोकांवर गंभीर गुन्हे दाखल करून त्यांच्यावर कठोरात कठोर कारवाई होणे गरजेचे आहे, राज्याचे गृहमंत्री या नात्याने देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालावे आणि प्रशांत कोरटकर सारख्या छत्रपतींचा द्वेश करणाऱ्या व्यक्तीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन देतेवेळी अंकुश कावडकर यांच्यासह महिला आघाडीच्या जिल्हाप्रमुख अलका निलेश पारडे, विधानसभा संघटक बबन विल्हेकर, युवा सेनेचे तालुकाप्रमुख सागर गिरे, विधानसभा समन्वयक पंकज राणे, सरपंच मोहन बायस्कर, किशोर टाले, नंदू पखाले, भरत हिंगणीकर, धनंजय पवार, दीपक बगाडे, शरद आठवले, शुभम विल्हेकर, राज गुजराती, रामसिंग साळुंखे, सुनिता मंडवे, निलेश पारडे आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

ज्याअर्थी, या महसुल न्यायालयात रा.मा.क्र //59(13) कुळ कायदा/ वडूरा/2024-25 प्रकरणात अर्जदार इनायमखान अ. खलील व इतर 05 रा. देऊरवाडा ता. चांदुर बाजार जि. अमरावती यांचे शेत मौजा वडूरा सर्वे नं. 39/2 क्षेत्र 3.43 हे. आर आकार रू.7.94 रू.पै पो.ख 0.60 भोगवटदार वर्ग-1 या शेतीचे कुळ वहीवाट अधिनियम (विदर्भ प्रदेश 1958 चे कलम 41,43,46,47,48) अंतर्गत या शेतीचे सेल सर्टीफीकेट (खरेदी प्रमाणपत्र) मिळणेबाबतचे प्रकरण या महसुल न्यायालयात दाखल केले आहे.

त्या अर्थी प्रकरणात ज्या कोणास आक्षेप वा हरकती घ्यावयाच्या असेल त्यांनी जाहीरनामा प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाचे आत आक्षेप वा हरकती दाखल कराव्या दिलेल्या मुदती नंतर आलेल्या आक्षेपांचा वा हरकतींचा विचार करण्यात येणार नाही यांची नोंद घ्यावी

दिनांक :- 05/03/2025

शिक्का

**( रामदास शेळके )**
**तहसिलदार, चांदुर बाजार**

# संतोष देशमुख यांच्या मारेकऱ्यांना फाशी द्या!

## दर्यापुरात शिवसेनेचे आंदोलन

## वाल्मीक कराडचा पुतळा जाळला



**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि.7 )** - बीड जिल्ह्यातील मस्साजोग या गावाचे सरपंच संतोष अण्णा देशमुख यांची अत्यंत निर्घुण हत्या करणाऱ्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्यात यावी, अशी मागणी करत दर्यापूर येथील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आंदोलन केले. यावेळी संतोष देशमुख हत्या प्रकरणातील मुख्य सूत्रधार वाल्मीक कराड याचा पुतळा सुद्धा जाळण्यात आला.

शिवसेनेचे जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात करण्यात आलेल्या या आंदोलनात शिवसैनिकांसह सर्वसामान्य नागरिकही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा देऊन देशमुख कुटुंबीयांना न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शिवसैनिकांनी जोरदार घोषणाबाजी केली.

आंदोलनात गोपाल अरबट यांच्यासह तालुकाप्रमुख महेंद्र भांडे, शहर प्रमुख तुषार चौधरी, महिला आघाडी तालुकाप्रमुख छाया निचळ, रजनी तायडे, नागोराव केले, गोपाल तराळ, मनोज गव्हाणे, अतुल सगळे, गणेश गावंडे, राजू पोहकार, विलास साखरे, राम गावंडे, श्रीकांत फलके, राहुल भुंबर, राजू कोकाटे, प्रवीण पाचपोहे, गौरव कंकाळे, श्याम साखरे, कमलेश वानखडे, नागेश कांबे, सौरव वायझाडे, विनय गावंडे, हेमंत उमाळे, सागर गेठे, दीपक कावनपुरे, गौरव सगणे, अनिकेत कोळमकर, स्वप्निल म्हात्रे, सागर आठवले, शांताराम तिजारे, सुनील देशमुख आदी प्रामुख्याने सहभागी झाले होते.

## काँग्रेस आमदार वडेट्टीवार यांना न्यायालयाची नोटीस

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :



ब्रम्हपुरीचे काँग्रेस आमदार विजय वडेट्टीवार यांना मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने नोटीस बजावली. निवडणुकीसाठी दाखल शपथपत्रावर आक्षेप नोंदवत त्यांची आमदारकी रद्द करण्यासाठी ही याचिका दाखल करण्यात आली आहे.

स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार नारायण जांभुळे यांनी ही याचिका दाखल केली. वडेट्टीवार यांनी दाखल केलेले शपथपत्र अवैध असून त्यांची आमदारकी रद्द करण्यात यावी, अशी विनंती याचिकेतून करण्यात आली आहे. याचिकेवर न्या.प्रवीण पाटील यांच्या खंडपीठासमक्ष सुनावणी झाली आणि न्यायालयाने त्यांना नोटीस बजावत पुढील सुनावणीत भूमिका स्पष्ट करण्याचे निर्देश दिले.

ब्रम्हपुरी विधानसभा मतदारसंघ हा महाराष्ट्र विधानसभेतील महत्वपूर्ण मतदारसंघांपैकी एक आहे. गडचिरोली-चिमूर लोकसभा मतदारसंघाचा भाग आहे. काँग्रेसचे विद्यमान आमदार विजय नामदेवराव वडेट्टीवार यांनी ब्रम्हपुरी मतदारसंघात तिसऱ्यांदा विजय प्राप्त केला. याच मतदारसंघातून स्वाभिमानी पक्षाचे उमेदवार म्हणून नारायण जांभुळे उमेदवार होते.

निवडणुकीच्या दरम्यानही जांभुळे यांनी वडेट्टीवार यांच्या शपथपत्रावर आक्षेप नोंदविला आहे. वडेट्टीवार यांनी ज्या मुद्रांकावर शपथपत्र सादर केले, तो त्यांच्या पत्नीने स्वतःच्या नावावर खरेदी केला आहे. वडेट्टीवार त्यावर शपथपत्र सादर करू शकत नाहीत. त्यामुळे मुद्रांक कायद्यानुसार त्यांचे प्रतिज्ञापत्र अवैध आहे. हा मुद्रांक पेपर करारनाम्यासाठी खरेदी करण्यात आला आहे. मात्र त्याचा उपयोग शपथपत्रासाठी करण्यात आला. त्यामुळे वडेट्टीवार यांची निवडणूक अवैध ठरवून रद्द करण्यात यावी अशी विनंती याचिकेत करण्यात आली आहे.

निवडणुकीत फटकारले होते

निवडणुकीच्या दरम्यान दाखल याचिकेनंतर याचिकाकर्त्याला न्यायालयाने तीव्र शब्दात फटकारले होते. भारतीय संविधानाचा उल्लेख करत न्यायालयाने याचिकाकर्त्याला विचारले ती तुम्हाला कायदे माहिती नाही आहेत काय? ही याचिका नियमाप्रमाणे नाही. याचिकाकर्त्याला निवडणूक याचिका दाखल करून हा विषयावर आक्षेप नोंदविणे गरजेचे आहे. संविधानातील कलम ३२९ नुसार न्यायालय निवडणूक प्रक्रिया सुरू झाल्यावर त्यात हस्तक्षेप करू शकत नाही. उच्च न्यायालयाने याचिकाकर्त्याला निवडणूक याचिका दाखल करण्याचा सल्ला देत ही याचिका फेटाळून लावली होती. याचिकाकर्त्याने निवडणूक संपल्यावर आता याप्रकरणात निवडणूक याचिका दाखल केली आहे.

# महिला दिनानिमित्त राज्यभरात विशेष ग्रामसभा


## ग्रामपंचायतींमध्ये होणार महत्त्वाचे ठराव : राज्य महिला आयोगाचा पुढाकार

■ महासागर प्रतिनिधी,नागपूर, दि.६ :

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत ८ मार्च रोजी राज्यभरातील सर्व ग्रामपंचयातींमध्ये विशेष ग्राम सभा आयोजित करण्यात येणार आहे. या विशेष ग्राम सभेतून महाराष्ट्र राज्य महिला आयोगाच्या संकल्पनेनुसार बालविवाह रोखणे, विधवा प्रथा बंद करणे तसेच महिला सुरक्षिततेसाठीचा ठराव या ग्रामसभांमध्ये करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य महिला आयोगाने या विशेष सभेची मागणी केली होती. महिला आयोगाच्या मागणीनुसार ग्रामविकास विभागाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांना ८ मार्च रोजी जागतिक महिला दिनानिमित्त सर्व ग्रामपंचायतीमध्ये विशेष ग्रामसभा आयोजित करण्याचे निर्देश दिनांक ६ मार्च रोजी पत्राद्वारे दिले आहेत. या प्रकरणी महिला आयोगाच्या रूपाली चाकणकर यांनी माहिती दिली आहे.

रूपाली चाकणकर म्हणाल्या, पुरोगामी व प्रगत राज्य असलेल्या महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर बालविवाह होत आहेत. महिला सर्वच क्षेत्रात आघाडीवर



असतानाही, विधवा महिलांना रूढी व अंधश्रद्धेमुळे जाचक प्रथांना सामोरे जावे लागत आहे.

या सोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी व्यापक स्तरावर जनजागृती व्हावी यासाठी विशेष ग्रामसभा बोलावून गावात बालविवाह होऊ न देणे, पतीच्या निधनानंतर महिलांना जाचक असणाऱ्या प्रथा बंद करणे, गावात मुलींचा जन्मदर वाढावा यासाठी प्रयत्न करणे आणि महिलांच्या सुरक्षेसाठी उपाययोजना करणे असे ठराव करण्यात यावे अशी आयोगाची संकल्पना आहे.

पुढे बोलताना रूपाली चाकणकर म्हणाल्या, संपूर्ण गावात असे ठराव शासकीय पातळीवर झाल्यास जनसामान्यांची वागणूक देत त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोनही अशा प्रयत्नांमधून बदलेल म्हणून आयोगाने अशी संकल्पना मांडली आहे.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने विशेष ग्रामसभा आयोजित केल्याबद्दल रूपाली चाकणकर यांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे व राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांचे आभार मानले आहेत. तसेच राज्यात पहिल्यांदाच महिलांच्या विषयांकरिता विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय झाल्याने महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने हा मैलाचा दगड असल्याचेही चाकणकर म्हणाल्या.

केंद्र शासनाच्या पंचायती राज विभागाच्या अप्पर सचिवांनी देशातील सर्व राज्यातील ग्रामविकास सचिवांना दिनांक २१ फेब्रुवारी २०२५ रोजीच्या पत्रान्वये जागतिक महिला दिनानिमित्त महिला सभा आयोजित करण्याच्या सुचना दिल्या होत्या.

## महात्मा फुले आणि सावित्रीबाईंना भारतरत्न देण्याची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

भाजप आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी समाजसुधारक महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न प्रदान करण्याची मागणी केली आहे. त्यांच्या या मागणीला सर्वपक्षीय १०० आमदारांनी पाठिंबा दर्शवला आहे.

आज या १०० आमदारांच्या सह्यांचे पत्र विधीमंडळात सादर करण्यात येणार आहे. राज्य शासनाने या विषयावर केंद्र सरकारकडे आग्रह धरावा आणि अधिकृत शिफारस करावी, अशी विनंती मुनगंटीवार यांनी केली आहे.

यासोबतच, त्यांनी या मागणीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना पत्रही पाठवले आहे. महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी भारतीय समाजाच्या उन्नतीसाठी महत्त्वपूर्ण कार्य केले असून, त्यांच्या योगदानाला सर्वोच्च सन्मान मिळावा, अशी भावना आमदारांनी व्यक्त केली आहे.

राजकीय पक्षांमधील मतभेद बाजूला ठेवून या मागणीसाठी सर्वपक्षीय आमदार एकत्र आल्याने या प्रस्तावाला अधिक बळ मिळण्याची शक्यता आहे. राज्य शासन केंद्राकडे अधिकृतरित्या शिफारस करते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आता मीडिया कंटेंट निगराणीसाठी केंद्र

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

महाराष्ट्र सरकारने प्रसार माध्यमांवर निगराणीसाठी एक केंद्र स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यासाठी १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हे केंद्र मुद्रित, इलेक्ट्रॉनिक, डिजिटल मीडियाच्या धोक्यांचे विश्लेषण केले जाईल. संभ्रम निर्माण होईल असे किंवा नकारात्मक बातम्यांच्या प्रकरणातच वेगाने स्पष्टीकरण देण्याचे काम हे केंद्र देऊ शकेल.

# महाराष्ट्रात १५ हजार रोजगार देणार रामदेव बाबा

## प्रकल्पासाठी १ हजार कोटींची गुंतवणूक ९ मार्चपासून नागपूर मिहान येथे भरती सुरू

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ६ :

उपराजधानीमधील मल्टी-मॉडल इंटरनॅशनल कार्गो हब आणि विमानतळ परिसरात असलेले पतंजली मेगा फूड अँड हर्बल पार्क येत्या ९ मार्चपासून उत्पादनासाठी सज्ज होणार आहे. या मेगा फूड पार्कची पायाभरणी सप्टेंबर २०१६ मध्ये झाली होती.

आता हे पार्क फळे आणि भाजीपाला प्रक्रियेचे एक प्रमुख केंद्र बनणार आहे. हे फूड पार्क विशेषतः संत्री, गोड लिंबू, लिंबू इत्यादी लिंबूवर्गीय फळांच्या प्रक्रियेसाठी डिझाइन करण्यात आले आहे. यामध्ये, दररोज ८०० टन फळांवर प्रक्रिया करून रस, रस सांद्रता, लगदा, पेस्ट आणि प्युरी तयार केली जाणार आहे. यासोबतच आंबा, पेरू, पपई, डाळिंब,





स्ट्रॉबेरी, सफरचंद, नाशपाती, टोमॅटो आणि गाजर यांसारख्या उष्णकटिबंधीय फळांवरही प्रक्रिया केली जाईल.

आतापर्यंत यामध्ये १ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात आली आहे. या फूड आणि हर्बल पार्क बद्दल अधिक माहिती देताना पतंजलीचे आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, स्थानिक महाराष्ट्रातील लोकांना रोजगार देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. आम्ही या ठिकाणी स्थानिक तरुणांना फूड प्रोसेसिंग बद्दल कौशल्य देण्यासाठी ट्रेनिंग ही चालवण्याचा विचार असल्याचे आम्ही या ठिकाणी जेवढा संत्रा शेतकऱ्यांकडून आणला जाईल तो सर्व घेण्याचा प्रयत्न करणार आहोत. फूड पार्कमध्ये रोज ८०० टन संत्रा लागणारच आहे. शिवाय त्यापेक्षा जास्त संत्रा प्रतिदिन आला तरी त्याचा वापर करण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे ते म्हणाले. नागपुरातील पत्रकार परिषदेमध्ये ते बोलत होते.

जे तंत्रज्ञान आम्ही इथे वापरणार आहोत, ते तंत्रज्ञान आशिया खंडात पहिल्यांदा फूड प्रोसेसिंग उद्योगात वापरले जात आहे. त्यामुळे आमचे उत्पादन जगात कुठल्या ही देशात निर्यात होऊ शकेल, असे दर्जाचे राहणार आहे. आतापर्यंत आम्ही १ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक केली आहे. ती भविष्यात वाढत जाणार आहे. या प्रकल्पात आमच्याकडे सेझच्या बाहेर २२५ एकर जमीन आहे, तर सेजमध्ये १०० एकर जमीन आहे. सध्या ५०० पेक्षा जास्त कर्मचारी या ठिकाणी काम करत आहे. संत्र्याशिवाय या ठिकाणी आवळा, एलोवेरा, पेरू आणि इतर फळांचे ज्यूस तयार करण्याची तयारी असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

### स्थानिकांनाच रोजगार देणार : आचार्य बाळकृष्ण

आचार्य बाळकृष्ण म्हणाले की, आम्ही बी आणि सी दर्जाच्या छोट्या आकाराची संत्रा घेणार आहोत. त्यामुळे लोकांना ए ग्रेडची संत्री बाजारातून खायला मिळतील. संत्र्याचा फक्त रस काढण्यासाठी वापर होणार नाही, तर संत्र्याची साल आणि लगद्याचा वापर इतर उत्पादन बनवण्यासाठी करणार आहोत. फूड आणि हर्बल पार्कमुळे दहा हजार लोकांना प्रत्यक्ष स्वरूपात रोजगार मिळेल, असे प्रयत्न राहणार आहे. स्थानिक महाराष्ट्रातील लोकांना रोजगार देण्याचा आमचा प्रयत्न राहणार आहे. आम्ही या ठिकाणी स्थानिक तरुणांना फूड प्रोसेसिंग बद्दल कौशल्य देण्यासाठी ट्रेनिंग ही चालवण्याचा विचार असल्याचे ही आचार्य बाळकृष्ण म्हणाले.

### : साप्ताहिक संवाद :

मागील सलग एक महिन्यापासून शेअर बाजाराच्या निर्देशांकात सातत्याने घसरण दिसतेय तर निफ्टी देखील खूप खालच्या पातळीवर पोचताना दिसतोय. शेअर बाजारातून गुंतवणूकदार मोठ्या प्रमाणात आपली गुंतवणूक काढून घेताना दिसताहेत. परिणामतः संपूर्ण देशभरात सध्या जोरदार मंदीचे सावट दिसतेय.याच पार्श्वभूमीवर शेअर बाजाराच्या याच दयनीय परिस्थिबद्दल अर्थ विश्लेषक प्रशांत कपाडिया यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

**मागील काही आठवड्यापासून शेअर बाजारात सातत्याने नीचांकी घसरण होतेय ती कशी?**

■ शेअर बाजारात या संपूर्ण महिन्यात आणि अगदी मार्च महिन्याच्या पहिल्या सप्ताहात अक्षरशः भूकंप झालेला दिसतोय. शेअर बाजाराचा निर्देशांक १,४१४,३३ अंकांनी कोसळून तो ७३,१९८. १० अंशावर बंद झाला. निफ्टी मध्ये देखील सलग आठव्या दिवशी ४२०. ३५ अंकांची घसरण होऊन तो २२,१२४. ७० अंशांवर आला. सेन्सेक्स आणि निफ्टीची हि यंदाच्या वर्षातील एका दिवसाची सर्वात नीचांक पातळीची घसरण आहे.

फेब्रुवारी हा सलग पाचवा महिना आहे कि शेअर बाजारात घसरण सुरूच दिसतेय. अशी परिस्थिती २८ वर्षांपूर्वी झालेली. १९९६ मध्ये जेंव्हा जुलै ते नोव्हेंबर महिन्यात निफ्टी २९ टक्क्यांनी घसरलेला मात्र त्यानंतर ३ महिन्यातच २० टक्क्यांनी सावरला होता.

**शेअर बाजारातील या नीचांकी घसरणीची कारण काय आहेत?**

■ शेअर बाजारातील नीचांकी घसरणीची अनेक अक्षरं आहेत. डोनाल्ड ट्रम्प यांनी मेक्सिको आणि कॅनडा वर अतिरिक्त १० टक्के टेरिफ लावलेला आहे. शिवाय चीनला देखील अतिरिक्त १० टक्के टेरिफ द्यावा लागणार आहे. यामुळे ट्रेंड युद्ध भडकणार आहे.



लोकरंग

आशियायी बाजारात आणि हाँगकाँगच्या शेअर बाजारात देखील कमालीची घसरण झाली मात्र तरीही आयटी कंपन्यांमध्ये नफेखोरी झाली. शिवाय परदेशी गुंतवणूकदाराकडून सतत विक्री होत आहे. ऑक्टोबर २०२४ पासून fiis ने जवळपास ३ लाख कोटींची गुंतवणूक केली आहे. कमाईची वाढ मंदावलेली आहे. आणि जागतिक तरलतेचा अमेरिका आणि चीनकडे कल वाढलेला आहे अशी अनेक कारण आहेत ज्यामुळे भारतीय शेअर बाजाराची स्थिती हि दयनीय झाली आहे.

**शेअर बाजाराची स्थिती पूर्ववत केंव्हा होईल?**

■ सध्या तरी शेअर बाजाराची स्थिती हि नाजूक आहे. परंतु भूतकाळाचा आढावा घेतला तर लवकरच बाजार पूर्ववत होण्याची शक्यता देखील आहे. येत्या दशकात भारत जागतिक वाढीच्या एक पंचमांश भागाला चालना देईल. हि धारणा जगासाठी बँक,ऑफिस आणि फॅक्टरी म्हणून देशाच्या वाढत्या स्थितीवर तसेच डिजिटल अर्थव्यवस्थेमुळे आणि हरित ऊर्जेकडे संक्रमणामुळे सक्षम झालेल्या वाढत्या ग्राहक वर्गावर अवलंबून आहे. भारतीय शेअर बाजार लवकरच वाढेल आणि नवीन उच्चांक गाठेल आणि हि अस्तिरता गुंतवणूकदारांचा विश्वास संपादन करेल. ■ ■

### लीलावती रुग्णालयाचा जागरूकता उपक्रम

दरवर्षी 3 मार्च हा दिवस बहिरेपणा आणि श्रवणशक्ती कमी करण्यासाठी जागतिक श्रवण दिन साजरा केला जातो. या दिवसाबाबत लोकांमध्ये जागरूकता निर्माण जगभरात विविध उपक्रम राबविले जातात. यानिमित्ताने वांद्रे येथील लीलावती रुग्णालयाने जागरूकता कार्यक्रमाचे आयोजन केले असून मुलांमध्ये श्रवणशक्ती कमी होण्याशी संबंधित आव्हाने आणि उपायांबद्दल जनजागृती करण्यात आली. या कार्यक्रमात श्रवणशक्ती कमी होण्याची कारणे आणि परिणाम, श्रवणशक्ती पुनर्संचयित करण्यात इम्प्लांटेबल श्रवणयंत्रांची भूमिका आणि प्रगत उपचारांचा लाभ घेतलेल्या कुटुंबांचे प्रेरणादायी अनुभवांचा समावेश होता.



प्रमुख पाहुण्यांमध्ये आयर्लंडच्या वाणिज्य दूतावासातील श्रीमती अनिता केली, ईएनटी सर्जन डॉ. क्रिस्टोफर डीसूझा, स्थायी विश्वस्त प्रशांत मेहता आणि मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. निरज उत्तमणी, सिनेअभिनेता शर्मन जोशी उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे, लीलावती हॉस्पिटलने श्रवणविषयक समस्या असलेल्या मुलांसाठी अत्याधुनिक उपचार प्रदान करण्याची आपली वचनबद्धता अधोरेखित केली. लीलावती हॉस्पिटल येथे नवजात मुलांमध्ये श्रवणशक्ती तपासण्यासाठी नवीनतम उपकरणे आणि अत्याधुनिक ऑपरेटिंग रूम, सीटी स्कॅन, एमआरआय इत्यादी सुविधा उपलब्ध आहेत.

लीलावती हॉस्पिटलचे कन्सल्टंट ईएनटी सर्जन डॉ. क्रिस्टोफर डीसूझा सांगतात की, लीलावती हॉस्पिटलने मुलांसाठी ५०० हून अधिक कॉक्लियर इम्प्लांट शस्त्रक्रिया यशस्वीरित्या केल्या आहेत, ज्यामुळे रुग्णांचे जीवन बदलले आहे आणि त्यांची श्रवण क्षमता पुनर्संचयित झाली आहे. यापैकी १०% प्रक्रियांमध्ये पूर्वी इम्प्लांट्स घेतलेल्या आणि पुढील उपचाराची आवश्यकता असलेल्या मुलांसाठी पुन्हा शस्त्रक्रिया करावी लागणार आहे. ■ ■

### : चला पर्यटनाला :

मध्य प्रदेशमध्ये अनेक पर्यटन स्थळे आहेत ज्यांनी जगभरातील लोकांना आकर्षित केले आहे. यात भारतातील काही महत्त्वाच्या पुरातत्व स्थळांचा समावेश आहे, ज्यापैकी अनेक युनेस्को जागतिक वारसा स्थळे आहेत. मध्य प्रदेशात येणारे पर्यटक या राज्याचे सौंदर्य आणि तेथील समृद्ध सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा पाहून थक्क होतात. भोपाळमधील राजा भोज आंतरराष्ट्रीय विमानतळावरून आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत उड्डाणे होतात. मध्य प्रदेशात रेल्वेने प्रवास करणे हा राज्यात पोहोचण्याचा सर्वोत्तम व स्वस्त मार्ग आहे.

खजुराहोमध्ये स्मारकांचा एक समूह आहे जो एकेकाळी हिंदू आणि जैनांसाठी प्रार्थनास्थळे होती. ही मंदिरे मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यात आहेत. ते युनेस्कोच्या जागतिक वारसा स्थळांचा एक भाग आहेत आणि भारतीय ऐतिहासिक वास्तुकलेचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहेत. ही 25 महत्त्वाची मंदिरे 885 ते 1050 या काळात चंडेला घराण्याने बांधली होती. मंदिरे त्यांच्या उत्कृष्ट कारागिरीमुळे आणि समृद्ध ऐतिहासिक मूल्यामुळे जगभरातील पर्यटकांना आकर्षित करतात. भोपाळ विमानतळावरून तुम्ही विमानाने खजुराहोला सहज पोहोचू शकता. पर्यटकांना या सुंदर ठिकाणी नेण्यासाठी विमानतळावरून 20 बसेस प्रवास करतात.

पचमढी नर्मदापुरम जिल्ह्यात आहे मध्य प्रदेशच्या. या आश्चर्यकारक हिल स्टेशनला अपवादात्मक निसर्गसौंदर्यासह समृद्ध ऐतिहासिक मूल्य देखील आहे. सातपुडा पर्वतरांगेच्या खोऱ्यात 1,067 मीटरवर वसलेल्या या शहरात मोठ्या प्रमाणात दृश्ये आणि धबधबे आहेत. सातपुडा पर्वतरांगांचे सौंदर्य पाहण्यासाठी येणाऱ्या अनेक पर्यटकांसाठी हे ट्रेकिंगचे लोकप्रिय ठिकाण आहे. येथील पांडव लेणींनाही महत्त्व आहे आणि मध्य प्रदेशातील प्रसिद्ध ठिकाणांपैकी एक म्हणून या लेण्यांना भेट द्यायला हवी. तुम्ही सातपुडा बायोस्फीअर रिझर्व्हला देखील भेट देऊ शकता, ज्यामध्ये वाघ, हत्ती, सरपटणारे प्राणी इत्यादी अनेक प्राणी राहतात. भोपाळला जोडणाऱ्या NH45 महामार्गावरून पर्यटक पचमढीला सहज पोहोचू शकतात. ■ ■

## मध्यप्रदेशातील खजुराहो



: संकलन व संयोजन :
सुबोध रणशेवरे, ९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## रिपब्लिकन पक्षाचे शक्तीप्रदर्शन

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ६ :

रिपब्लिकन पक्षाने सत्ता मिळवली पाहिजे, आणि जर सत्तेत हक्काचा वाटा नसेल, तर तो वाटा हिसकावून घेण्याची ताकद कार्यकर्त्यांमध्ये असली पाहिजे, असे विधान केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी केले. ईशान्य मुंबईतील कार्यकर्ता मेळाव्यात त्यांनी भाजप-शिवसेना युतीवरही टीका करत रिपब्लिकन पक्षाच्या स्वबळावर लढण्याच्या क्षमतेवर भर दिला.

**बंडखोरीचा इशारा**

आगामी महानगरपालिका निवडणुकीत रिपब्लिकन पक्षाने निर्णायक भूमिका बजावावी, अशी आठवले यांची भूमिका आहे. महापालिकेत तिकीट मिळाले नाही, तरी बंड करून निवडून येण्याची ताकद आपल्यात असली पाहिजे, असे ते म्हणाले. भाजप-शिवसेनेच्या युतीत तिकीट वाटपावरून मोठे वाद होतात, बंडखोरी होते, आणि त्यातून अनेक उमेदवार निवडूनही येतात. त्यामुळे रिपब्लिकन पक्षानेही याच धर्तीवर आपली ताकद दाखवून दिली पाहिजे, असा सल्ला त्यांनी पक्ष कार्यकर्त्यांना दिला.

**महाबोधी महाविहारच्या ताब्यासाठी संघर्षाचा इशारा**

बुद्धगया येथील महाबोधी महाविहार संपूर्णपणे बौद्धांचेच असूनही, महाबोधी टेंपल कायद्यामुळे त्यात हिंदू ट्रस्टींचा समावेश आहे. हा कायदा रद्द करून महाबोधी महाविहार बौद्ध समाजाच्या ताब्यात देण्यात यावा, अशी मागणी आठवले यांनी केली. अन्यथा बौद्ध समाज स्वतः ही सत्ता हिसकावून घेण्यास सक्षम असल्याचा इशारा त्यांनी दिला.

मुलुंड येथील महाकवी कालिदास नाट्यगृहात झालेल्या या कार्यकर्ता मेळाव्यात रिपब्लिकन पक्षाने भव्य शक्तिप्रदर्शन केले. पक्षाचे ईशान्य मुंबईतील हजारो कार्यकर्ते या मेळाव्यासाठी एकवटले होते. कार्यक्रमाला रिपब्लिकन पक्षाच्या महिला आघाडीच्या राष्ट्रीय नेत्या सीमाताई आठवले, ईशान्य मुंबई जिल्हाध्यक्ष अजितभाऊ रणदिवे, योगेश शिलवंत यांच्यासह अनेक वरिष्ठ पदाधिकारी उपस्थित होते.

## राष्ट्रवादीचा पदाधिकारी तडीपार

### फडणवीसांचा अजित पवारांना धक्का

■ महासागर प्रतिनिधी
अकोला, दि. ६ :

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील महाराष्ट्रातील महायुती सरकारमध्ये घटक पक्षांनाच एका मागून एक धक्के देण्याचे प्रकार सुरू आहेत. आता मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना मोठा धक्का दिला.

फडणवीस यांच्या गृह खात्याने राष्ट्रवादी पक्ष अजित पवार गटाच्या अकोट शहर अध्यक्षाला थेट तडीपार केले. या कारवाईची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा रंगली आहे.

राज्यातील महायुती सरकारमध्ये भाजपसह शिवसेना शिंदे गट व राष्ट्रवादीचा अजित पवार गट हे प्रमुख घटक पक्ष सहभागी आहेत. सत्ताधारी पक्षांमध्ये एकमेकांवर कुरघोडीचे राजकारण सुरूच असते.

आता अकोला जिल्ह्यातील एका प्रकरणावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला कोंडीत पकडल्याचे चित्र दिसून येते. पाच सराइत गुन्हेगारांना जिल्ह्यातून एक वर्षाच्या कालावधीसाठी तडीपार करण्याचा आदेश अकोट येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा अकोटचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनमोल मित्तल यांनी निर्गमित केला. या कारवाईमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाचा अकोट शहराध्यक्ष जाकीर शहा रशीद शहा याला देखील तडीपार करण्यात आले. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

अकोट शहर अत्यंत संवेदनशील असून गुन्हेगारी कारवायांचे केंद्र म्हणून देखील ओळखले जाते. गुन्हेगारांवर वारंवार कारवाई केल्यानंतरही त्यांच्यात सुधारणा होत नसल्याने पोलिसांनी कठोर पावले उचलली आहेत.

अकोट येथील पाच सराईत गुन्हेगारांना तडीपार करण्यात आले. ग्रामीण हद्दीतील अजमत शहा उर्फ अज्जु तयब शहा (रा. अडगाव खुर्द), जाकीर शहा रशीद शहा (रा. अमीनपुरा, अकोट), विजय साहेबरा अंभोरे, लखन साहेबराव अंभोरे (दोन्ही रा राजेंद्र नगर अकोट), हिवरखेड हद्दीतील अब्दूल वहीद अब्दुल रफीक (रा. अडगाव) यांना एक वर्षासाठी तडीपार केले. यापुढे देखील त्यांचा गुन्हेगारी प्रक्रियेत सहभाग राहिल्यास थेट ह्यएमपीडीएह्न अंतर्गत कारवाई करण्याचा इशारा अकोला पोलीस दलातील अधिकाऱ्यांनी दिला.

अजित पवार गटाच्या शहराध्यक्षालाच तडीपार करण्यात आले आहे. या प्रकारामुळे गुंडालाच पदावर नियुक्त केल्याचा मुद्दा समोर आला असून पक्षाची प्रतिमा देखील मलीन झाली आहे.

# ...अन्यथा इच्छामरणची परवानगी द्या!

■ महासागर प्रतिनिधी
बुलढाणा, दि. ६ :

राज्याच्या शैक्षणिक प्रगतीत महत्वाचा वाटा असतानाही राज्य शासन आणि प्रशासन यांच्या दुर्लक्षाचे बळी ठरलेल्या समग्र शिक्षा अभियान मधील कंत्राटी कर्मचाऱ्यांनी राज्यव्यापी काम बंद आंदोलन सुरु केले आहे.

विधिमंडळ अधिवेशनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई स्थित आझाद मैदान येथे राज्यातील समग्र कर्मचाऱ्यांनी ठिय्या दिला आहे. या आंदोलनात बुलढाणा जिल्ह्यातील ११० कंत्राटी कर्मचारी सहभागी झाले आहे. समग्र शिक्षा अभियानातील सन २००२ पासून कार्यरत कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या विविध मागण्या प्रलंबित असून त्या मागण्यांच्या पूर्ततेसाठी समग्र शिक्षण विभागातील कर्मचाऱ्यांनी ४ मार्चपासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे.



मुंबई येथे सुरू असलेल्या या कामबंद आंदोलनात बुलढाणा जिल्ह्यातील ११० कर्मचारी सहभागी झाले आहेत. बुलढाणा जिल्ह्यात एकूण २१० कर्मचारी काम करीत असून त्यापैकी अपंग समावेशित शिक्षण विभागातील काही कर्मचारी शासनाने सन २०२४ मध्ये निवडणुकीच्या आधी कायम केले. मात्र याच विभागातील एमए बीएड, एमएससी, नेट, सेट, पीएचडी धारक, असे कर्मचारी काम करतात. कायम न केलेल्या कर्मचाऱ्यांनी ४ मार्चपासून मुंबई येथे काम बंद आंदोलन सुरू केले आहे. आपल्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी या कर्मचाऱ्यांनी वेळोवेळी अधिवेशनावर मोर्चा, आंदोलने, उपोषण करून २० वर्षांपासून पाठपुरावा करीत आहे. मात्र शासनाकडून मागण्यांकडे दुर्लक्ष केले जात असल्याने हे आंदोलन करण्यात येत आहे.